७० वर्षे

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## कामगारांच्या कागदपत्रांची पडताळणी करा

मुंबई (दै. संध्या) : मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्यापासून बांग्लादेशी मुस्लिमांविरोधातील मोहिम तीव्र करण्याच्या हालचाली तीव्र करण्यात आल्यानंतर आता भाजपने आपला मोर्चा महापालिकेच्या कामांमधील कंत्राटदार नियुक्त कामगारांकडे वळवला. भाजपच्या गोरेगाव येथील नगरसेविका प्रिती सातम यांनी,मुंबई महापालिकेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या रस्ते सिमेंट काँक्रिटीकरणसह विविध नागरी सेवा आणि पायाभूत प्रकल्प कामातील कामगारांची ओळख पटवण्यासाठी कागदपत्रांची पडताळणी करण्याची मागणी मुंबईच्या महापौर रितू तावडे आणि महापालिका आयुक्त डॉ भुषण गगराणी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्यामुळे महापालिकेच्या घरापासून आता भाजपने बांग्लादेशींचा शोध घेण्याचा प्रयत्न सरु केला आहे. मुंबई महापालिकेच्या विविध नागरी सेवा आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जी कंत्राट कामे देण्यात आली आहेत. त्या कामांमध्ये कंत्राटदार नियुक्त कामगार हा बांगलादेशी मुस्लिम तर नाही ना? हे शोधून काढण्यासाठी प्रत्येक कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कामगाराची ओळख पटवण्याचा दृष्टिकोनातून त्या कामगारांच्या कागदपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### विवाह नोंदणीसाठी नवा प्रस्ताव

मुंबई (दै. संध्या) : गुजरातमध्ये विवाहाच्या नोंदणीत काही बदल करण्यात आले आहेत. सध्याच्या नियमांनुसार, विवाहाची नोंदणी करण्यापूर्वी संबंधित जोडप्याने आपल्या आई-वडिलांना माहिती दिली असल्याची नोंद करणे अनिवार्य ठरणार आहे. या निर्णयामुळे कुटुंबीयांच्या नकळत लग्न करण्याच्या घटनांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुजरात सरकारने विवाह नोंदणी कायद्यात दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केला आहे. विशेषतः नियम ४४ मध्ये बदल सुचवण्यात आला असून, हा बदल जनहिताचा असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. प्रस्तावानुसार विवाह नोंदणी अर्ज करताना आई-वडिलांची सविस्तर माहिती देणे आवश्यक राहील. नव्या प्रक्रियेनुसार, अर्जदार जोडप्याला एक औपचारिक घोषणापत्र सादर करावे लागेल. त्यामध्ये पालकांना विवाहाबाबत माहिती दिल्याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक असेल. त्याचबरोबर आई-वडिलांचे ओळखपत्र, कायमचा पत्ता आणि मोबाईल क्रमांक नमूद करावा लागेल. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर सहाय्यक निबंधकांकडून संबंधित पालकांना दहा कामकाजाच्या दिवसांत इलेक्ट्रॉनिक किंवा लेखी स्वरूपात सूचना पाठवली जाणार आहे.

#### वसई-दिवा मार्गावर मेगाब्लॉक

मुंबई (दै. संध्या) : दिवा-वसई रोड मार्गावरील खारबाव स्थानकात नवीन अप आणि डाऊन मालवाहू मार्गिकांच्या कामासाठी शनिवार आणि रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे सात मेमू लोकल रद्द केल्या जाणार आहेत. तर लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्यांच्या वेळापत्रकातही फेरबदल करण्यात आला आहे. वसई-विरार आणि पनवेल-दिवा दरम्यान प्रवास करणारे बहुसंख्य प्रवासी या रेल्वे मार्गावर धावणाऱ्या गाड्यांवर अवलंबून आहेत. या प्रवाशांना खासगी वाहनांचा किंवा एसटी बसचा आधार घ्यावा लागणार आहे. त्यांचे हाल होणार आहेत. त्यामुळे या मार्गावर रेल्वेने प्रवास सुरू करण्याआधी पत्रकाबाबतची ताजी माहिती जाणून घेण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या महाॲग्री एआय धोरणाचा परिचय

## कृषी क्षेत्राच्या विकासासाठी 'एआय'च्या सहाय्याने प्रभावी उपाययोजना शक्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नवी दिल्ली (दै. संध्या)



कृषी क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचण्याची गरजही मुख्यमंत्र्यांनी प्रतिपादित केली.

नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट -२०२६ मधील 'एआय इन ॲग्रिकल्चर' या विषयावरील चर्चासत्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री नितेश राणे यांची उपस्थिती होती. या चर्चासत्रात मुख्य सचिव राजेश अग्रवाल, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव देवेश चतुर्वेदी, कृषि सचिव विकासचंद्र रस्तोगी, एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, जागतिक बँकेच्या दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष जोहॅन्स झुट, एकस्टेप फाऊंडेशनचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शंकर मरुवाडा सहभागी झाले होते. नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी भारत सरकार, जागतिक संशोधन संस्था, गुंतवणूकदार यांच्याशी महाराष्ट्र सरकार सहकार्य करण्यासाठी तयार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षिततेवर ताण आला आहे. अनिश्चित वातावरण, घसरणारी पाणी पातळी, जमिनीचा खालावणारा दर्जा, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक मार्केटमधील अनिश्चितता यांचा या आव्हानांमध्ये समावेश आहे. अशा परिस्थितीत आर्टीफिशीअल इंटेलिजन्स महत्वाची भूमिका पार पाडू शकते, असे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, जगातील अनेक देशांसाठी कृषी विषय केवळ आर्थिक विषयाशी निगडीत नाही. कृषी विषय अन्न सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता, आर्थिक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. यामुळे भारताने याबाबत फार पूर्वीच विचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या इंडिया एआय मिशनमध्ये कृषी क्षेत्राचा प्रामुख्याने विचार केला आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर , सेवापुरवठा, समावेशकता यांचा विचार केला गेला आहे. श्री. फडणवीस यांनी सांगितले की, भारतातील सुमारे निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. पण यापैकी फार कमी लोकांना बदलते हवामान, शेतीसाठी आवश्यक असणारे निविष्ठाचे दर, शेतमालाचे बाजारभाव, वित्तपुरवठा याबाबत माहिती उपलब्ध आहे. सध्याच्या व्यवस्थेला गतीने माहिती पुरवण्यात आणि आवश्यक माहिती देण्यात काही मर्यादा आहेत. यावर आर्टीफिशीअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने मात करू शकतो. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स शेतीसाठी आवश्यक असणारी बँकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेजची माहिती देऊ शकते. यामध्ये वातावरणातील बदल, जलसिंचन, खतपुरवठा, बाजारभावातील फेरबदल आणि पुरवठा साखळी याबाबत माहिती देऊ शकते. आर्टीफिशीअल इंटेलिजन्स जादूची कांडी नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी एआय माडेल विश्वासार्ह डेटा, सुशासन आणि लोकांशी असलेले उत्तरदायित्व यावर आधारित असायला हवे.

शेतीतील आर्टीफिशीअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादीत न राहता ती लाखो लोकांपर्यंत पोहोचायला हवे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यासाठी महाराष्ट्र शासनाने महाॲग्री एआय धोरण स्वीकारले आहे. हे धोरण सर्वांसाठी खुले आणि परस्पर समन्वय साधणारे आहे. या धोरणावर आधारित विकसित केलेला मोबाईल प्लॅटफॉर्म बहुभाषांमध्ये वैयक्तिक सल्ला देतो, बाजारपेठेतील घडामोडींची माहिती देतो, वातावरणातील बदलाबाबत सूचना देतो आणि अनेक शासकीय योजनांबाबत सल्ला देतो. या सेवेला शेतकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ही बाब शेतकरी आर्टिफिशीअल इंटेलिजन्ससाठी सज्ज आहेत, स्पष्ट करते. आर्टीफिशीअल इंटेलिजन्सवर आधारित टेस्ट, इंटीग्रेशन आणि क्रॉप सँप विकसित करणे आमचे ध्येय आहे. शेतीशी निगडीत सर्व डेटाचे एकत्रीकरण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या डेटाच्या आधारे शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी काम झाले पाहिजे.

# भिगवण अपहरण प्रकरणाला वेगळे वळण!

## *मुलीची बाजू घेतल्याने राहुल कुल यांच्यावर आरोप; 'मलाही मुलगी आहे..' म्हणत भावनिक साद*

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील भिगवण येथील कथित अपहरण प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले असून, यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. बेपत्ता असलेल्या मुलीने स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर होत, आपले अपहरण झाले नसून आपण स्वमर्जीने मुलासोबत गेल्याचा जबाब दिला आहे. मध्यरात्री मुलगा आणि मुलगी दोघेही पोलिस ठाण्यात हजर झाले आणि पोलिसांनी मुलीचा अधिकृत जबाब नोंदवून घेतला. मात्र, या प्रकरणावरून आमदार राहुल कुल यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी त्यांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे.

आमदार राहुल कुल यांनी या आरोपांना प्रत्युत्तर देत आपली बाजू स्पष्ट केली आहे. घटना घडल्यापासून मी मुलीच्या नातेवाईकांच्या आणि पोलिस प्रशासनाच्या सतत संपर्कात होतो, जेणेकरून मुलीचा सुरक्षित शोध घेता येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, आपल्यावर होणारे आरोप फेटाळताना त्यांनी भावनिक आवाहनही केले. मलाही मुलगी आहे आणि माझ्या घरातही महिला पदाधिकारी आहेत, त्यामुळे अशा संवेदनशील विषयात मी केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे तर एक पालक म्हणूनही कर्तव्य पार पाडत होतो, असे स्पष्टीकरण कुल यांनी दिले आहे.

# छगन भुजबळ राज्यसभेवर जातील : अमोल कोल्हेंचा गौप्यस्फोट

पुणे (दै. संध्या)



अभिनेते व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांचे पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. परंतु, या व्याख्यानाला काही संघटनांनी विरोध केल्याचे पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठात पोलिसांचा बंदोबस्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अमोल कोल्हे यांनी पत्रकारांशी संवाद देखील साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की, जोपर्यंत तुम्ही छत्रपती मांडताय तोपर्यंत या महाराष्ट्रात कोणाच्या बापाला घाबरायचे नाही. तसेच छगन भुजबळ हे राज्यसभेवर जातील, असे अजितदादा ओघात म्हणाले असल्याचा गौप्यस्फोट देखील कोल्हे यांनी केला आहे. पत्रकारांशी बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, मला विरोध का केला गेला हे मला माहित नाही. परंतु सावित्रीबाई फुले विद्यापीठाने मला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जे व्याख्यान आयोजित करायचे होते, या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी ही मागणी केली होती. त्यानुसार मला विद्यापीठाने निमंत्रण दिले. मला आत्ता काही माध्यमकर्मींकडूनच समजत आहे की काही संघटनांनी मला विरोध केला आहे. परंतु, यांची कुठलीही कल्पना नाही. आज मी इथे आलो आहे. माझी विरोध करणाऱ्यांना विनंती आहे, की त्यांनी माझे व्याख्यान ऐकावे आणि प्रश्न विचारा. पुढे बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, विरोध करणे ही काही नवीन गोष्ट नाही. कारण ज्या छत्रपतींच्या विषयी बोलायला येतोय, त्या शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला देखील विरोध झाला आहे. याच पुण्यात त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याला देखील विरोध झाला आहे. पहिला पुतळा उभारण्याला सुद्धा विरोध झाला आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी ही तब्बल 180 वर्ष लोकांच्या स्मरणात राहिली नाही. याही वस्तुस्थिती आहेत. त्यामुळे मला असे वाटते की कुठलेही व्याख्यान करणे विद्यार्थ्यांशी संवाद साधणे हा वैचारिक भाग आहे. आणि मी जेव्हाही छत्रपतींची भूमिका साकारतो तेव्हा राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून करतो.

# मी शिंदेंना पुन्हा भेटेन, काय चर्चा करायच्या त्या करा!

## राज ठाकरेंचा भेटीवर संशय घेणाऱ्यांना टोला; निकोप राजकारण करण्याचा सल्ला

मुंबई (दै. संध्या)



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज आपण मुंबईसह विविध शहरांतील समस्यांच्या मुद्यांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याचे स्पष्ट केले. आज निवडणुका संपल्या आहेत. आता एकनाथ शिंदे सत्तेत आहेत. त्यांना काही सूचना करायच्या असतील, चांगल्या गोष्टी करवून घ्यायच्या असतील तर त्यांना भेटू नये का? मी त्यांना पुन्हा भेटेन. तुम्हाला काय चर्चा करायच्या त्या करा, असे ते शिंदेंसोबतच्या भेटीत राजकारण शोधणाऱ्यांना टोला हाणताना म्हणालेत.

राज ठाकरे यांनी गुरुवारी सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीविषयी राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. विशेषतः ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणी राज यांच्यावर टीका केली होती. राज ठाकरे यांनी आज मनसेच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना या भेटीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आपल्याकडे आता पूर्वीसारखे निकोप राजकारण राहिले नाही. आज कुणी कुणाला भेटल्यानंतर त्यात युत्या, आघाड्याचे राजकारण शोधले जाते. आता 3 वर्षांनंतर निवडणुका आहेत. आता तर तशी परिस्थितीही नाही. आता निवडणुका संपल्यात.

आज ते (शिंदे) सत्तेत आहेत. आम्हाला त्यांना काही सजेशन द्यायचे असतील, चांगल्या गोष्टी करून घ्यायच्या असतील, तर त्यांना भेटू नये का? प्रत्येकवेळी त्यात काहीतरी शोधलेच पाहिजे याची काहीच आवश्यकता नाही. उद्या मी मुख्यमंत्र्यांनाही भेटेन. आज मुंबई, पुणे, ठाणे आदी अनेक शहरांत अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांवर आम्हाला जे वाटते ते सांगणे गरजेचे नाही का? तुम्ही (पत्रकार) त्या दिवशी तिकडे असता तर तिथेच बोललो असतो.

# राजेंद्र ढेरिंगेला जामीन मंजूर; नरहरी झिरवाळांनी प्रतिनियुक्ती केली रद्द

मुंबई (दै. संध्या)



राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या विभागातील लाचखोरी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या लिपिक राजेंद्र ढेरिंगेला जामीन मिळाला आहे. मुंबई सत्र न्यायालयातील एसीबीच्या विशेष न्यायालयाने ढेरिंगेला जामीन मंजूर केला आहे. राजेंद्र ढेरिंगेची न्यायालयीन कोठडीत रवानगी होताच त्याच्या जामिनावर सुनावणी घेण्यात आली आणि त्यात त्याला दिलासा मिळाला आहे. या प्रकरणी मंत्री नरहरी झिरवाळ यांनी कठोर भूमिका घेतल्याचे पाहायला मिळत आहे. लिपिक राजेंद्र ढेरिंगेविरोधात कठोर कारवाईचे आदेश झिरवाळ यांनी दिले आहेत. तसेच केवळ चौकशीच नव्हे तर त्याची प्रतिनियुक्ती रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विभागातील दक्षता पथकाला सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले असून, वस्तुनिष्ठ व सर्वंकष अहवाल तातडीने सादर करण्यास सांगितले आहे. दरम्यान, एसीबीच्या पथकाने राजेंद्र ढेरिंगेच्या नाशिक रोड येथील घरात काही दिवसांपूर्वी झडती घेतली होती. या झडतीत काही महत्त्वाचे कागदपत्रे हाती लागल्याची माहिती आहे.

# महाराष्ट्रातील स्टार्टअप्सच्या कामगिरीचे मंत्री नितेश राणे यांच्याकडून कौतुक

## इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये मंत्री नितेश राणे यांची उपस्थिती : जागतिक एआय रोडमॅपचा घेतला सखोल आढावा

नवी दिल्ली (दै. संध्या)



नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक दर्जाच्या शिखर परिषदेत राज्याचे मंत्री श्री.नितेश राणे यांनी उपस्थित राहून कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रातील जागतिक घडामोडी, विविध देशांची धोरणे आणि भविष्यातील एआय रोडमॅप यांचा सखोल आढावा घेतला. सोमवारपासून सुरू झालेल्या या सहा दिवसीय परिषदेचे उद्घाटन माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. २० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, ५०० पेक्षा अधिक जागतिक एआय तज्ज्ञ, तंत्रज्ञान उद्योजक आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी झाले असून ही परिषद भारताच्या डिजिटल क्षमतेचे आणि नेतृत्वाचे प्रतीक ठरत आहे. मंत्री नितेश राणे यांनी परिषदेदरम्यान महाराष्ट्र स्टॉलला भेट देऊन राज्यातील स्टार्टअप्स, संशोधन प्रकल्प आणि डिजिटल उपक्रमांची माहिती घेतली. महाराष्ट्रातील तरुण उद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पनांचा त्यांनी विशेष गौरव केला. राज्याच्या सर्वांगीण विकासात एआयचा प्रभावी वापर करण्यासाठी उद्योग, आरोग्य, शेती, मत्स्यव्यवसाय आणि प्रशासन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. परिषदेत गुगलच्या बूथला भेट देत मंत्री राणे यांनी 'Health AI' मॉडेल्सचे सादरीकरण पाहिले. महाराष्ट्रस्थित स्टार्टअप @DimensionNXG यांच्या भागीदारीत विकसित करण्यात आलेल्या या मॉडेल्समुळे AIIMS सारख्या सरकारी रुग्णालयांमध्ये आरोग्यसेवा अधिक वेगवान, अचूक आणि परिणामकारक होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. मंत्री राणे यांनी 'एक्स' (X) पोस्ट करत म्हटले आहे की, "AI मुळे सरकारी आरोग्य व्यवस्थेत मोठी क्रांती घडू शकते, याचे प्रभावी उदाहरण येथे पाहायला मिळाले. जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान निर्मितीत महाराष्ट्रातील स्टार्टअप्स आघाडीवर असल्याचे पाहून अभिमान वाटतो. ही परिषद भारताच्या डिजिटल भविष्याला नवी दिशा देणारी ठरणार आहे." असे मंत्री नितेश राणे म्हणाले.

इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ या शिखर परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनीही सहभाग घेतला. आपल्या भाषणात त्यांनी 'डिजिटल इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमांमुळे भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात भक्कम पायाभरणी केली असल्याचे सांगितले. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' ही परिषद भारताला जागतिक एआय हब बनविण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक टप्पा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संपादकीय

# मिनी विधानसभेनिमित्ताने मोठी घुसळण

दक्षिण महाराष्ट्रातील (कोल्हापूर-सांगली) स्थानिक राजकारणात, विशेषतः सहकारी संस्था आणि पंचायत समित्यांमध्ये मोठी उलथापालथ होत आहे. स्थानिक नेत्यांचे गट बदलणे, नवीन आघाडी तयार होणे यामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया अत्यंत चुरशीची बनली आहे. सत्तासंघर्षात बाजी मारण्यासाठी दोन्ही बाजूंनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांच्या जिल्हा परिषद निवडणुकीचे निकाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाल्यानंतर दक्षिण महाराष्ट्राच्या राजकारणात नवी उलथापालथ सुरू झाली आहे. आता अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू असून, प्रत्येक जिल्ह्यात पक्षीय आकडेवारी, आरक्षण आणि गुप्त चर्चा यांचा मेळ घालून सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न सुरू आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील खेळीमेळी, फुटीर गट आणि स्थानिक नेत्यांची प्रतिष्ठा यामुळे तीनही जिल्हे 'मिनी विधानसभे'सारखे वाटत आहेत. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता स्थापनेसाठी चुरस वाढली आहे. उलथापालथ: दिग्गज नेत्यांच्या निर्णयामुळे समीकरणे बदलत असून अनेक ठिकाणी नवीन गट (आघाडी) तयार होत आहेत. अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी बैठका आणि गुप्त चर्चांचा वेग वाढला आहे. सत्ता टिकवण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी फोडाफोडीचे राजकारण पाहायला मिळत आहे. या उलथापालथीत कोणता गट बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सांगली जिल्हा परिषदेच्या ६१ जागांपैकी कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत (३१) मिळाले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) १८ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला, तर भाजपला १६ जागा मिळाल्या. काँग्रेसचे ११ उमेदवार विजयी झाले. वाळवा तालुक्यात जयंत पाटलांनी बालेकिल्ला राखला, तर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नांनंतरही भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. दहा पंचायत समित्यांपैकी भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी (शरद), राष्ट्रवादी (अजित) आणि काँग्रेस यांना प्रत्येकी दोन समित्यांवर सत्ता मिळाली. अध्यक्षपदासाठी आता पोस्ट-पोल आघाडीची चर्चा सुरू आहे. जयंत पाटलांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी शरद पवार, काँग्रेस व अन्य छोट्या गटांसोबत सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहे. दुसरीकडे भाजप महायुतीच्या साथीने बहुमत गोळा करण्याचा दावा करत आहे. सांगली ही पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणाची 'बारोमीटर' मानली जाते. येथील अध्यक्ष निवड आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांपैकी भाजप २७ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला, तर राष्ट्रवादी काँग्रेसला २० आणि शिवसेनेला १५ जागा मिळाल्या. राष्ट्रवादी (अजित पवार गट) ची कामगिरी चांगली दिसली, परंतु स्पष्ट बहुमत (३३) कोणालाही नाही. अध्यक्षपद ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने ९ ओबीसी महिला सदस्यांमधून एकाची निवड होणार आहे. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, "साताऱ्यात भाजपचाच अध्यक्ष होईल." शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने रणनीती आखली आहे. शंभूराज देसाई (शिवसेना) यांच्यासोबत 'पॅचअप' करून बहुमत गोळा करण्याची शक्यता आहे. अर्थात शंभूराज देसाई यांच्या अटी शर्तीवर ते ठरेल. राष्ट्रवादी-शिवसेना आघाडीला बहुमत असतानाही दावा न करता भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. सातारा जिल्हा परिषदेत प्रथमच भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून, तीन पंचायत समित्यांवरही त्यांची सत्ता आली आहे. यामुळे स्थानिक नेतृत्व बळकट होण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ६८ जागांपैकी महायुतीला ५१ जागा मिळून स्पष्ट बहुमत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) २० जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला, तर काँग्रेस १४ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर. हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीने उच्चांकी कामगिरी केली. अध्यक्षपद शाहूवाडी तालुक्यासाठी राखीव असल्याचे संकेत मिळत आहेत. राजकुंवर गायकवाड यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. महायुतीत अध्यक्षपद वाटपाची चर्चा सुरू आहे – प्रथम राष्ट्रवादी, नंतर भाजप किंवा शिवसेना अशी वाटणी होईल. महानगरपालिकेप्रमाणे सव्वा वर्षाचा रोटेशन फॉर्म्युला येथेही लागू होण्याची शक्यता aahe. काँग्रेसचे सतेज पाटील यांनी महायुतीतील गोंधळ हेरून दुरावलेल्या नेत्यांशी संपर्क साधला असल्याचेही बोलले जाते.

## संस्कृत सुभाषित

अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति
नायं लोकोऽस्तिं न परो न सुखं संशयात्मन :।।
(भीष्मपर्व, अध्याय २८, ४० महाभारत)

अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

## गुरु वचन

### ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रूप

प्रार्थना ईश्वराशी एकरुप होण्याची प्रभावी पद्धत आहे. लोक विविध प्रार्थना करतात. काही लोक संसारिक वस्तूंसाठी प्रार्थना करतात. उदाहरणार्थ चांगली नोकरी, नवे घरे किंवा नवी कार. काही लोक आरोग्यासाठी प्रार्थना करतात ज्यामुळे ते किंवा त्यांचे कुटूंब सुदृढ व्हावे. काही लोक वैयक्तिक संबंध वृद्धींगत होण्यासाठी प्रार्थना करतात. पण बहुतांश लोक संसारिक वस्तुंसाठीच प्रार्थना करतात. सामान्यपणे जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण ईश्वराकडे स्वत:साठी काहीतरी मागतो. आपण नेहमी त्या वस्तूंसाठी प्रार्थना करतो, ज्या आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यावेळी आपली जीवनाबाबत माहिती मर्यादित असते. अनेकदा आपण अशा गोष्टींसाठी प्रार्थना करु शकतो ज्या आपल्यासाठी फायदेशीर आहेत पण अखेरीस त्या गोष्टी आपल्यासाठी फायदेशीर ठरत नाही. आपण प्रार्थना करुन एखादी वस्तू मिळवू शकतो पण मोठ्या काळानंतर ती आपल्या लायक नसल्याचे दिसते.

म्हणून मी समजतो की, प्रार्थनाची योग्य पद्धत ईश्वराची इच्छा आपल्या जीवनात उतरवणे. म्हणून अनेक धर्मात म्हण आहे की, माझी इच्छा नव्हे तुमची इच्छा पूर्ण होवो. का? कारण ईश्वराला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची माहिती असते. तो जाणतो की, खरंच आपल्यासाठी काय सर्वोत्तम आहे. उदाहरणार्थ आपण विचार करूतो की, १ कोटीची लॉटरी लागली तर खुप बरे होईल.

पण आपण हे लक्षात घेत नाही की, एवढे पैसे मिळाल्यानंतर दोन गोष्टी होऊ शकतात. आपण मोठ-मोठ्या वस्तूंच्या खरेदीत इतके गुरफटतो की आपण ईश्वराला विसरतो किंवा आपल्या सर्व मित्रांना पैशात वाटा हवा असतो. आपण पैसे न देण्यामुळे मैत्री तुटू शकते व आपण एकटे पडू शकतो म्हणून आपल्यासाठी काय चांगले आहे? हे आपण खरंच समजून घेत नाही. आपल्या मर्यादित दृष्टीकोनामुळे आपण ते मागतो जे आपल्या विचारानुसार चांगले आहे पण जर आपण हे ईश्वरावर सोडले की आपल्यासाठी जे सर्वोत्तम असेल ते त्याने द्यावा तेव्हा आपण खरी प्रार्थना करतो.

प्रार्थनेचे सर्वोच्च रूप म्हणजे ईश्वराला जाणणे व ईश्वरात एकरुप होणे. ईश्वरास जाणण्याची प्रार्थना म्हणजे त्या शक्तीचे आवाहन करणे जिने आपली निर्मिती केली. जेव्हा ईश्वरास जाणण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण होते तेव्हा ती एक अविरत प्रार्थना बनते, जी तोवर थांबत नाही जोवर आपण ईश्वरास प्राप्त करून घेत नाही.

ईश्वर जाणण्याच्या अशाच प्रार्थनेला ध्यान (मेडिटेशन) किंवा योगा म्हटले जाते. ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रुप आहे. प्रार्थनेत आपण ईश्वराला सांगतो की, आपणास काय हवे आहे. ध्यानात आपण ईश्वरास ऐकतो की, त्यास काय हवे आहे.

ध्यान म्हणजे शांत बसणे नाही. या दरम्यान आपले संपूर्ण लक्ष ईश्वरास शोधत असते. आपण जीवनातील सर्व लक्ष्य विसरुन ईश्वराची दया आपल्या कशी प्रवेश करेल? या तयारीने बसतो. ध्यान यांत्रिक काम नाही. तथापि, काही प्रार्थना यांत्रिक असतात. या ईश्वरात लीन होण्यासाठी आपले मन, व आत्म्यात उठणारी तीव्र इच्छा आणि व्याकुळ अवस्था आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:रेवती १९:०६:४९ |
| २१ फेब्रुवारी २०२५ | योग:शुभ १५:५०:३५ |
| शनिवार | करण:विष्टि १३:०१:०६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव २४:०७:०५+ |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्– १९४७ | चन्द्र:मेष१९:०६:४९ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास– फाल्गुन | तारीख – ३ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | विनायक चतुर्थी |
| तिथि:चतुर्थी १३:०१:०६ | जागतिक मातृभाषा दिन |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | | | 6 | | 8 | |
| 1 | | | | | 8 | | 7 | |
| 2 | 5 | | 3 | 7 | 1 | | | |
| 4 | | | | | | 6 | 3 | 1 |
| 3 | | 9 | 1 | | 7 | 8 | | 4 |
| 8 | 1 | 5 | | | | | | 9 |
| | | | 9 | 1 | 3 | | 6 | 2 |
| | 4 | | 7 | | | | | 8 |
| | 2 | | 4 | | | 3 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८६५ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 7 | 6 | 5 | 1 | 2 | 9 | 8 |
| 5 | 9 | 1 | 2 | 7 | 8 | 3 | 4 | 6 |
| 6 | 8 | 2 | 4 | 9 | 3 | 5 | 1 | 7 |
| 2 | 7 | 4 | 8 | 3 | 9 | 6 | 5 | 1 |
| 8 | 6 | 5 | 1 | 2 | 4 | 9 | 7 | 3 |
| 3 | 1 | 9 | 7 | 6 | 5 | 8 | 2 | 4 |
| 1 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 7 | 8 | 5 |
| 9 | 5 | 8 | 3 | 1 | 7 | 4 | 6 | 2 |
| 7 | 4 | 6 | 5 | 8 | 2 | 1 | 3 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८०४ – जगातील पहिले वाफेवर चालणारे रेल्वे इंजिन वेल्समधील पेन-इ-डॅरेन आयर्नवर्क्स या कारखान्यात तयार झाले.
- १८४८ – कार्ल मार्क्सने साम्यवादी जाहीरनामा (कम्युनिस्ट मॅनिफेस्टो) प्रकाशित केला.

### राष्ट्रीय

- २००७– जम्मू-काश्मीरमध्ये एका सूफी संताच्या मजार परिसरात झाडांच्या तुटलेल्या फाद्यांवर कुराणातील आयतांचे छापे आढळल्याचा दावा मजूरांनी केला.
- २००७ – कोठामंगलम येथे एकाचवेळी जन्म घेतलेल्या जुळ्या बहिणींचे मृत्यूही एकाच वेळी नौका अपघातात झाला.
- २००८ – वादग्रस्त ठरलेल्या जोधा-अकबर चित्रपटाचा खेळ नवीन पनवेल सेक्टर १० मधील सिनेराज चित्रपटगृहात चालू असताना बॉम्बस्फोट झाला. हा स्फोट शक्तीशाली नसल्याने यात सुदैवाने कोणीही जखमी झाला नाही.

### जन्म

- १६८८ – उलरिका एलिनोरा, स्वीडनची राणींचा जन्म.
- १७२८ – झार पीटर तिसरा, स्त्राज्ञी कॅथेरिनचा पतीचा जन्म.
- १८७५ – जीन काल्मेंटंचा जन्म. हिचे मृत्युच्या वेळचे वय १२२ वर्षे व १६४ दिवस होते. हा जागतिक उच्चांक आहे.
- १९३७ – हॅराल्ड पाचवा, नॉर्वेचा राजा यांचे जन्म.

### निधन

- १४३७ – जेम्स पहिला, स्कॉटलंडचे राजा यांचे निधन.
- १५१३ – पोप ज्युलियस दुसरा यांचे निधन.
- १८४६ – निंको, जपानी स्राट यांचे निधन.

## : SMS :

Aap ki shaan me
char line pesh kar
raha hu.!!pasand
aaye to Taaliya
bajakar navajiyega..
........
........
........
GIN LO...PURI
CHAR LINE HAI.....

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.५ | २२.५ |
| अहमदनगर | २८.८ | १९.९ |
| अकोला | ३२.२ | २२.८ |
| अमरावती | ३१.३ | २१.६ |
| बीड | ३३.३ | २१.३ |
| भंडारा | ३२.१ | १८.२ |
| बुलढाणा | २४.८ | १३.२ |
| चंद्रपूर | ३२.९ | २०.७ |
| चेन्नई | ३१.४ | १९.७ |
| नवी दिल्ली | २५.२ | १५.२ |
| धुळे | ३१.५ | २३ |
| गोंदिया | ३०.४ | १७.३ |
| जळगाव | ३२.५ | २२.५ |
| कोल्हापूर | ३०.८ | १८.३ |
| लातूर | ३०.४ | १९.७ |
| मुंबई | २९.६ | २४.१ |
| नागपूर | ३०.७ | १८ |
| नांदेड | ३२ | २१.१ |
| नंदूरबार | २९.२ | २२.५ |
| नाशिक | ३०.१ | १८.४ |
| पुणे | २८.९ | १८.६ |
| पंढरपूर | ३०.८ | २१.२ |
| सातारा | ३०.७ | १७.८ |
| सांगली | ३१.७ | १८.९ |
| सोलापूर | ३१.१ | २१.७ |
| वर्धा | ३२ | २०.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
वारसा हक्काचे प्रश्न थोड्या सबुरीने सोडवा.

**तुळ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
आर्थिक फायद्याच्या काही चांगल्या बातम्या हाती घेऊन नववर्षात पदार्पण कराल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
मोठे व्यवहार करताना एकदम धोका पत्करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
आवडीच्या गोष्टीसाठी वेळ देता येईल. कुटुंबात होणाऱ्या प्रेमाच्या चार गोष्टी उत्साह वाढवतील.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व
बेकारांना नोकरीची खात्री यातून नववर्षाच्या उज्वल पहाटेचे स्वागत करता येईल.

**धनु :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
कामाची सुरुवात चांगली होईल. काही शुभकार्ये आनंदाने पार पडतील. निर्णय घेण्यासाठी विलंब करू नका.

**कर्क :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम
वैवाहिक जीवनाची सुरुवात आनंदाच्या प्रसंगांनी होईल. प्रसन्नता उत्साह वाढवेल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
एखाद्या चांगल्या बौद्धिक चर्चेने वर्षाची सुरुवात होईल. पक्की असलेली मते प्रभाव टाकतील.


**सिंह :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम
दळणवळण खात्यातील लोकांना आपले महत्त्व वाढविता येईल. आपल्या महत्त्वाच्या प्रश्नात सुलभ मार्ग निघेल.

**कुंभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:दक्षिण
जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.

**कन्या :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
घरात एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी विशेष उत्साह आणणारी ठरेल.

**मीन :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
संततीच्या दृष्टीने एखादी चांगली बातमी आपला उत्साह वाढविणारी ठरेल. घरातील वातावरण आनंदी राहील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६६



**आडवे शब्द**
१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

**उभे शब्द**
१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दु:ख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे
६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे
७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ८६५ चे उत्तर**

आडवे उत्तर १.लंबोदर पितांबर ७.चकमक १०.टोळी ११.गरज १२.जाचक १४.दलदल १६.कांदा १७.नीरस १९.चालचलन २०.लवाद २१.अनाथ २२.बाप्पा २३.सनाथ २४.सरोज २५.तरूण २७.मोल २८.सणक २९.कथा ३०.परवड ३२.लहरबहर ३५.कवायत ३७.माननीय ३९.मणेर ४०.मनकवडा ४२.सय ४३.शबरी ४४. समान ४६.माता ४८.तुलसीदास ५०. मेजवानी ५३.दरदाम ५५.लेकरू ५७.भर ५८.लहानसा ६१.खरीप ६२.सुवास ६३.सराव ६४.तळवा ६५.तलाव ६६.समई ६७.रयत ६८.रखु ७०.कलाकार ७२.रचणे ७४.ये-जा ७५. सफेद ७८.उपरणे ७९.आणीबाणी ८०.तारवा

उभे उत्तर : २.बोगदा ३.दर ४.रजनीनाथ ५.तांबूस ६.रजाचा गज करणे ७.चकचकीत ८.मदनबाण ९.कल १०.टोलवाटोलव १३.चल १५.दल १६.कांता १८.रथ २१.अनाकलनीय २३.सण २४.सबब २६.रुसवा २७.मोर २८.सदमा ३०.पतन ३१.डबडा ३३.हय ३४.हम रीतुमरीवर येणे ३६.यमन ३८.नसता ४१.कन्नोज ४४.सदा ४५.मासलेवाईक ४६.मामलतदार ४७.हादसा ४९.सीता ५०.मेरू ५१.वाभरा ५२.नीरवता ५४.दाखला ५६.कस ५९.हाळ ६०.नवारणे ६२.सुम ६३.समरसता ६५.ततपप ६९.खुजा ७१.लावणी ७३.चरा ७४अ. कोणी ७६.फेर ७७.दवा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## सहकारी बँकेला कोटींचा गंडा! 91 लाखांचे सोने निघाले चक्क 'बनावट'

पुणे (दैनिक संध्या) : शहरातील एका बहुराज्य सहकारी बँकेच्या दोन शाखांमध्ये तब्बल ९१ लाख रुपयांच्या बनावट सोनेतारण कर्ज घोटाळ्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४१ कर्ज प्रकरणांत तारण ठेवलेले सोने फेरतपासणीत पूर्णपणे खोटे असल्याचे निष्पन्न झाल्याने बँक प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संबंधित कर्जदार आणि तत्कालीन गोल्ड व्हॅल्युएटर अजित प्रभाकर कुलकर्णी यांच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी बँकेची तब्बल ९१ लाखांची फसणूक झाली आहे. गोल्ड व्हॅल्युअर कुलकर्णी मोबाइल बंद ठेऊन, कार्यालयाला व घराला कुलूप लावून पळून गेला आहे. पोलिसांनी सांगितले की, कल्याण जनता सहकारी बँकेचे उप व्यवस्थापक निलेश देशमुख (५०, रा.अमनोरा टॉवर) यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार दाखल केली होती, त्यानूसार वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात व्हॅल्यूअरसह तब्बल ४२ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. ही फसवणूक दि. २६ ऑक्टोबर २०२० ते ३० जून २०२१ या कालावधीत वारजे आणि बिबवेवाडी शाखांमध्ये झाली आहे. येथून एकूण ४१ ग्राहकांनी सोनेतारण कर्ज घेतले होते. बँकेच्या नोंदीनुसार सर्व ग्राहकांनी बचत खाती उघडून आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. गोल्ड व्हॅल्युएटर अजित कुलकर्णी यांनी दागिन्यांची शुद्धता व वजन तपासून प्रमाणपत्र दिले होते. त्यावर विश्वास ठेवून बँकेने वार्षिक ८.५% व्याजदराने कर्ज मंजूर केले. एकूण ९१ लाख रुपये कर्ज वितरित करण्यात आले. प्रारंभी काही महिन्यांपर्यंत कर्जदारांनी व्याजाची रक्कम भरली. मात्र, त्यानंतर परतफेड थांबली. परिणामी सर्व खाती अनुत्पादक कर्ज घोषित करण्यात आली. कर्जदारांशी संपर्क साधूनही प्रतिसाद न मिळाल्याने आणि गोल्ड व्हॅल्युएटरचा मोबाइल बंद असल्याने बँकेला संशय आला. संबंधित व्हॅल्युएटर त्यांच्या निवासस्थानी व कार्यालयात उपलब्ध नसल्याचेही स्पष्ट झाले. दरम्यान दि. ६ व ७ ऑगस्ट २०२५ रोजी बँकेने नव्याने नियुक्त गोल्ड व्हॅल्युएटर विवेक एकनाथ डहाळे (प्रथमेश ज्वेलर्स) यांच्या उपस्थितीत, वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आणि पंचांसमक्ष सर्व सिलबंद पाकिटांची सीसीटीव्ही रेकॉर्डिंगसह फेरतपासणी केली असता तारण ठेवलेले सर्व दागिने बनावट होते. त्यांची बाजारमूल्य शून्य असल्याचा अहवाल सादर करण्यात आला.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट, पुणे यांच्या पुढाकाराने आणि अखिल बाजीराव रोड रामनवमी उत्सव समिती ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत नुमवी शाळेसमोर, बाजीराव रोड, लोखंडे तालीम चौक, पुणे येथे होणार आहे. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य महाराष्ट्र राज्य तथा कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार नामदार चंद्रकांतदादा पाटील आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी व उपचार, रक्तातील साखर (BSL-R), रक्तगट, रक्तदाब, कोलेस्टेरॉल तसेच रक्तातील घटकांची (HB, RBC, WBC, PLT) तपासणी केली जाणार आहे. दंत तपासणी, कीड काढणे व सिमेंट भरणे, स्केलिंग व पॉलिशिंग या सेवा उपलब्ध असतील. तसेच ४० वर्षांवरील नागरिकांसाठी मोतीबिंदू व काचबिंदू तपासणी, महिलांसाठी ४० ते ६० वयोगटातील स्तन कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) सुविधा देण्यात येणार आहे. महिलां व पुरुषांसाठी जवळच्या दृष्टीसाठी मोफत चष्म्यांचे वाटपही करण्यात येईल. सुमारे १३,५०० रुपयांच्या आरोग्य तपासण्या पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सुमित कुंभार (९५२९२३९६२८) आणि ओमकार नवले (८३०८७६०९८५) यांच्याशी संपर्क साधावा.

## मेलेल्या माणसाने विकला 11 कोटींचा प्लॉट? जमीन घोटाळ्याचा पर्दाफाश

पुणे (दैनिक संध्या) : आगाखान पॅलेससमोरील कोट्यवधी किमतीच्या प्लॉटवर मृत व्यक्तीच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून खरेदी-विक्री व गहाणखत केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिल्ली येथील व्यावसायिक अभिनव कोतरू (५०) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. तक्रारीनुसार येरवडा येथील आगाखान पॅलेससमोर, सुमारे ११ हजार ६०० चौरस फुटांचा प्लॉट आहे. हा प्लॉट दिवंगत ब्रिज किशन कोतरू यांनी १९७२ साली खरेदी केला होता. त्यांचे २१ ऑगस्ट २०१२ रोजी निधन झाले. न्यायालयीन आदेशानंतर २०२२ मध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळाले व २०२५ मध्ये नगर भूमापन कार्यालयात फेरफार नोंदही वारसांच्या नावावर झाली. मात्र, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्लॉटवरील वॉचमनला काही व्यक्तींनी प्लॉट आम्ही खरेदी केला असल्याचे सांगून जागा रिकामी करण्यास सांगितल्याने प्रकार उघड झाला. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्तीने स्वतःला "एस.के. अँग्रो" कंपनीचा सीएमडी असल्याचे सांगत डिसेंबर २०२४ मध्ये ब्रीज किशन कोतरू यांच्याकडून प्लॉट खरेदी केल्याचा दावा केला. विशेष म्हणजे, ब्रीज किशन कोतरू यांचे निधन २०१२ मध्ये झालेले असताना ३ व ४ डिसेंबर २०२४ रोजी दुय्यम निबंधक, हवेली क्र. १९, औंध येथे अॅग्रीमेंट टू सेल, सेलडीड व गहाणखत नोंदवण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, अज्ञात तोतया व्यक्तीला "ब्रीज किशन कोतरू" म्हणून उभे करून, दोन साक्षीदारांच्या मदतीने आणि एस.के. अँग्रोफूड टेक प्रा. लि. कंपनीच्या प्रतिनिधीच्या सहभागाने हे बनावट दस्त तयार करण्यात आले. या व्यवहाराच्या आधारे बँक कर्ज प्रक्रियाही सुरू केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, काही व्यक्तींनी ११ कोटी रुपयांत प्लॉट खरेदीचा व्यवहार झाल्याचा दावा करीत स्टॅम्प ड्युटीवर ७० -८० लाख रुपये भरल्याची माहिती तक्रारदारांना मिळाली.

## शाळांचा डंका! गुणवत्ता मूल्यांकनात पुणे जिल्ह्यातील 'या' शाळा अव्वल

पुणे (दैनिक संध्या) : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची (एसक्युएएएफ) निर्मिती करण्यात आलेली आहे. त्याअंतर्गतच्या बाह्य मूल्यांकनात पुणे जिल्ह्यातील ८१ शाळांना ए प्लस श्रेणी प्राप्त झाली असून त्यात पुणे जिल्हा परिषदेच्या तब्बल २८ शाळांचा समावेश असून हे उल्लेखनीय यश ठरले आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली. शाळांना स्वयं-मूल्यांकनासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. सन २०२४-२०२५ मध्ये राज्यातील १ लाख २ हजार ६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले. सन २०२४-२०२५ मध्ये स्वयं मूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळांच्या पैकी सन २०२५-२०२६ मध्ये १० हजार ७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात आली.

### निर्भय, सुरक्षित संवाद व मानवी विचारशक्तीला चालना देणाऱ्या

# 'गुरुचॅट्स'चे 'क्वांटमफोर्स'तर्फे लोकार्पण

पुणे (दै. संध्या) :

माणसाच्या विचारशक्तीला, एकाग्रतेला आणि संशोधक वृत्तीला चालना देणाऱ्या 'गुरुचॅट्स' या डिजिटल संवाद मंचाचे दूरदृश प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. क्वांटमफोर्स इन्कच्या वतीने या 'एआय' आधारित प्रणालीची निर्मिती करण्यात आली असून, भारतासह अमेरिकेत 'गुरुचॅट्स'द्वारे मुक्त, निर्भय व सुरक्षित संवाद करता येणार आहे, अशी माहिती 'क्वांटमफोर्स'चे मुख्य कार्यकारी अधिकारी व संशोधक भूपेंद्र चौधरी यांनी दिली. भूपेंद्र चौधरी म्हणाले, "गुरुचॅट्स हे एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड आणि नॉन-रेकॉर्डेबल डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये संभाषण केवळ त्या सत्रापुरते मर्यादित राहते. डिजिटल संवादातील 'रेकॉर्डिंग कल्चर' आणि अति-स्वयंचलनाला




पर्याय देण्याचा त्यामागील उद्देश आहे. तंत्रज्ञानामुळे संवाद अधिक कार्यक्षम झाला असला, तरी त्याने लक्ष केंद्रीकरण आणि बौद्धिक धैर्य कमी केले आहे. हा प्लॅटफॉर्म विद्यापीठे, कॉर्पोरेट नेतृत्व संघ, सल्लागार, शिक्षक, थिंक टँक आणि समुदाय गटांसारख्या उच्च-विश्वासाच्या वातावरणासाठी तयार करण्यात आला आहे, जिथे गोपनीय चर्चा आवश्यक असते. 'कॉग्निटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर' म्हणून गुरुचॅट्स लक्ष, स्मरणशक्ती, विश्लेषण क्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य वाढवण्यासह मानवी विचार प्रक्रियेला प्रोत्साहन देते." या संवाद मंचाच्या निर्मितीमागे प्राचीन अथेन्समधील 'निक्स' या ऐतिहासिक ठिकाणाची प्रेरणा आहे. त्या ठिकाणी नागरिक निर्भयपणे सार्वजनिक चर्चा करत असत.

त्याची कुठेही नोंद होत नाही. त्याच धर्तीवर आधुनिक डिजिटल जगात विश्वासार्ह व मुक्त संवादाची जागा निर्माण करण्याचा प्रयत्न या मंचातून करण्यात आला आहे. हा प्लॅटफॉर्म विश्वासार्ह, व्यावसायिक वातावरण निर्मिती करणारा आहे. कोणत्याही माहितीची चोरी, मोडतोड करण्याचा धोका यामध्ये राहणार नाही. कंपनी सुरक्षित संवाद क्षेत्रात विस्तार करत असताना अधिकृत माध्यमांद्वारे भागीदारीच्या संधी, संस्थात्मक परवाने आणि प्रारंभिक प्रवेश उपलब्ध करून देणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. कंपनीनुसार अमेरिका आणि भारत येथे एकत्रित लाँच करण्यामागे शैक्षणिक व बौद्धिक चर्चेची मजबूत परंपरा असलेल्या बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याची रणनीती आहे. लाँचनंतर होणाऱ्या जागतिक परिषदेत शिक्षक, संस्थात्मक भागीदार आणि प्रारंभिक वापरकर्ते सहभागी होऊन खाजगी, उपस्थिती-आधारित संवादाच्या भविष्यासंदर्भात चर्चा करणार आहेत. सुरक्षित संवाद क्षेत्रात विस्तार करताना अधिकृत माध्यमांतून भागीदारी संधी, संस्थात्मक परवाने आणि अर्ली-ॲक्सेस सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असे चौधरी यांनी सांगितले.

### 'गुरुचॅट्स'ची वैशिष्ट्ये

- सुरक्षित, एन्क्रिप्टेड डिजिटल संवाद मंच
- संभाषण रेकॉर्ड, सेव्ह किंवा पुन्हा ऐकता येत नाही
- मुक्त चर्चा व धोरणात्मक संवादासाठी उपयुक्त
- विद्यापीठे, कंपन्या, प्रशिक्षक व संशोधन संस्थांसाठी उपयुक्त
- लक्ष, विचारशक्ती व संवाद कौशल्य वाढवण्यावर भर

"आधुनिक नेतृत्वासाठी ही प्रगत प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. तसेच संशोधन व प्रशिक्षण यामध्येही 'गुरुचॅट्स' महत्वपूर्ण ठरेल. रेकॉर्डिंग, ट्रान्सक्रिप्शन किंवा रीप्लेची सुविधा नसलेला हा संवाद मंच मुक्त आणि निर्भय संवादाला चालना देतो. त्यामुळे व्यावसायिक, विद्यार्थी, शिक्षक, सल्लागार, संशोधक आणि नेतृत्व संघ मुक्तपणे विचार मांडू शकतील."

**- भूपेंद्र चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, क्वांटमफोर्स इन्क**

## कात्रज डेअरी चौकात भीषण अपघात; डंपरच्या चाकाखाली चिरडून महिलेचा जागीच मृत्यू

पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील कात्रज डेअरी चौक परिसरात एक भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुपिटर मोटार मोपेड (क्र. GJ 01 PZ 1374) वरून जात असताना संबंधित महिलेला एमएच १२ वाय क्यू ७२५९ क्रमांकाच्या हायवा डंपरने जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीवरील महिला डंपरच्या पाठीमागील टायरखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव प्रतिमा प्रधान (वय-३८) असून



त्या कात्रज कोंढवा रोड येथील श्रीज्वेल सोसायटीमध्ये वास्तव्यास होत्या. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत हायवा डंपर चालकाला ताब्यात घेतले आहे. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. दरम्यान, मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी ससून हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे. अपघाताचे नेमके कारण समजण्यासाठी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## राहुल गांधींना धमकीप्रकरणी पुण्यात काँग्रेसचे निषेध आंदोलन

पुणे (दै. संध्या) :

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सोशल मीडियावरून धमकी दिल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बालगंधर्व चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले. संबंधित व्यक्तीवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी राहुल गांधी व काँग्रेसच्या खासदारांना दिल्या गेलेल्या धमक्यांचा निषेध करत लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची गरज अधोरेखित केली. संसदेमध्ये विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी देशाच्या सुरक्षेसंदर्भातील मुद्दे उपस्थित




### संबंधितांवर कारवाईची मागणी

करत असल्यामुळे राजकीय वातावरण तापले असल्याचेही त्यांनी नमूद केले. धमकी देणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष रमेश बागवे, खजिनदार अॅड. अभय छाजेड, शहर उपाध्यक्ष प्राची दुधाने यांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी निषेध व्यक्त केला.

कार्यक्रमाला अजित दरेकर, वीरेंद्र किराड, सुनिल मलके, मेहबुब नदाफ, अमिर शेख, सुनिल शिंदे, राज अंबिके, नगरसेवक साहिल केदारी, वैशाली भालेराव, अश्विनी लांडगे, स्वाती शिंदे, सीमा सावंत, उषा राजगुरू, प्रियंका मधाळे, अनिता धिमधिमे आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

काँग्रेसच्या वतीने प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## जेईई मेन २०२६ मध्ये आकाश इन्स्टिट्यूट पुण्याची शानदार कामगिरी

### १६ विद्यार्थ्यांचे यश; ९९.९९ पर्सेंटाइलसह दीक्षांत शर्माचा टॉप स्कोर



पुणे (दै. संध्या) :

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) अंतर्गत पुण्यातील 16 विद्यार्थ्यांनी जेईई मेन 2026 (सेशन 1) मध्ये पुन्हाएकदा उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या सातत्यपूर्ण यशाची साक्ष दिली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांनी16 फेब्रुवारी रोजी जाहीर केलेल्या निकालानुसार, जेईई मेन 2026 मध्येआकाश इन्स्टिट्यूट, पुणे येथील 16 विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

दीक्षांत शर्माने 99.99 पर्सेंटाइलसह टॉप स्कोरर म्हणून आपली चमकदार कामगिरी दाखवली. त्याच्यानंतर तेजस कोरेने 99.78 पर्सेंटाइल, तर पियुष यादवने 99.75 पर्सेंटाइल मिळवले. शिवप्रसाद लक्ष्मण देवकरने 99.71 पर्सेंटाइल मिळवले, तर प्रत्युष आलोक कुमार तिवारीने 99.54 पर्सेंटाइलसह उत्कृष्ट यश संपादन केले.

कैवल्य विजय घरगेने 99.44 पर्सेंटाइल मिळवले, तर पार्थ निकमने 99.43 पर्सेंटाइल प्राप्त केले. आर्या दिवेकरने 99.35 पर्सेंटाइल मिळवले. निखिल बेवाल आणि सोहम निशिकांत पाटील या दोघांनीही 99.31 पर्सेंटाइल मिळवले. दिव्या दीपक कटारियाने 99.29 पर्सेंटाइल, तर उत्कर्ष प्रदीप निबेने 99.20 पर्सेंटाइल मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

ओम देशमुखने 99.15 पर्सेंटाइल मिळवले, हसिनी चिक्काला हिने 99.08 पर्सेंटाइल मिळवले, वरद महाडिकने 99.05 पर्सेंटाइल साध्य केले, तर पर्ल सोमाणीने 99.04 पर्सेंटाइल मिळवले. या सर्व यशामुळे जेईई मेन 2026 मध्ये पुणे विभागाची एकूणच भक्कम आणि प्रभावी कामगिरी स्पष्टपणे दिसून येते.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना डॉ. एच. आर. राव, चीफ ऑफ अकॅडेमिक्स आणि बिझनेस हेड, आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडयांनी सांगितले: "पुण्यातील आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले उत्कृष्ट निकालहे त्यांच्या अभ्यासावरील समर्पणाचे तसेच आकाशच्या मजबूत शैक्षणिक इकोसिस्टमचे स्पष्ट उदाहरण आहे. त्यांच्या मेहनतीचा आम्हाला खूप अभिमानआहे आणि त्यांच्या यशाबद्दल आम्ही त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

## शाळेत सोडण्याच्या बहाण्याने मुलीवर लैंगिक अत्याचार

पुणे (दै. संध्या) :

■ वारजे माळवाडी पोलिसांकडून एकाविरुद्ध गुन्हा

शाळेत सोडण्याची बतावणी करुन अल्पवयीन मुलीवर मोटारीत बलात्कार करण्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीतील आहे. ज्ञानेश्वर सुरेश रायरीकर (वय २९, रा. पोळ कॉलनी, आपटे सोसायटी रस्ता, वारजे माळवाडी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा शाळकरी मुलीच्या ओळखीचा आहे. त्याची पीडित मुलीच्या आईशी ओळख होती. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणेसातच्या सुमारास अल्पवयीन मुलीला मोटारीतून शाळेत सोडतो, असे सांगून तिला आरोपीने नेले. कर्वेनगर भागातील डीपी रस्त्यावर त्याने मोटार थांबविली. मोटारीत त्याने मुलीला धमकावून बलात्कार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास त्याने मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या मुलीने याबाबतची माहिती आईला दिली.

त्यानंतर आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस आयुक्त सुजाता तानवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक तरडे तपास करत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वंदे मातरमला दिलेल्या सर्वोच्च सन्मानाला विरोध

### काँग्रेसने गाठली खालची पातळी : दिल्ली सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात "वंदे मातरम्" गीताच्या प्रदर्शन आणि सन्मानासाठी शासकीय निधी !

पुणे (दै. संध्या) :

सनातन संस्थेने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत दिल्ली येथे 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित केला होता. या निमित्ताने देशभरातील विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने देशभरातून हजारो हिंदुत्वनिष्ठ येणार असल्याने त्यांच्या समोर मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या संकल्पनेनुसार 'वंदे मातरम'चा गौरव व्हावा, या दृष्टीने सनातन संस्थेने वंदे मातरम् गीताचे भव्य प्रदर्शन तीन दिवस भारत मंडपमच्या शेजारील हॉल क्र. १२ मध्ये आयोजित केले होते. तसेच मुख्य कार्यक्रमात वंदे मातरमचे समूह गान आयोजित केले होते.




त्याचबरोबर या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक शस्त्रे होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. मंत्र्यांच्या हस्ते करण्याचे निश्चित झाले होते आणि त्यासाठी नियमित शासकीय पद्धतीने आम्ही शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार सर्व प्रशासकीय मान्यता घेऊन शासनाने त्याला मान्यता दिली. या व्यतिरिक्त उर्वरित कार्यक्रम हा सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवाचा होता आणि त्याचे नावच 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' असे होते, त्यामुळे त्याला हिंदू राष्ट्राचा महोत्सव म्हणून खोटा प्रचार काँग्रेसकडून केला जात आहे, असे उत्तर सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिले आहे.

सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. वर्तक पुढे म्हणाले की, या कार्यक्रमात कोणतेही भारतीय संविधान विरोधी भाषण झाले नाही. सर्व वक्त्यांनी हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांची बाजू मांडली आणि त्यावर उपाययोजना सांगितल्या. प्रत्यक्षात कांग्रेसचे तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री घटनात्मक पदावर असताना "कांग्रेस मतलब मुस्लिम और मुस्लिम मतलब कांग्रेस" अशी घटनाविरोधी घोषणा करतात, काँग्रेसचे तत्कालीन प्रधानमंत्री "इस देश की साधनसंपत्ती पर पहिला अधिकार मुसलमानो का है", असे वक्तव्य करतात. सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा नाकारूनही धर्माच्या आधारावर मुस्लिम समाजाला आरक्षण घोषित करतात, केरळमध्ये काँग्रेसचे नेते बीफ बैन ला विरोध करण्यासाठी रस्त्यावर गोहत्या करतात, हे सर्व संविधान विरोधी नाही का? त्यामुळे काँग्रेसने अगोदर स्वतःची पापे बघावीत.

काँग्रेसने केलेले शिखांचे हत्याकांड आजही लोक विसरलेले नाहीत, तसेच बाटला हाऊसच्या आतंकवाद्यांसाठी अश्रू काढणे, मुंबई येथील २६/११च्या आतंकवादी हल्ल्यात कसाब आदी पाकिस्तानी आतंकवादी सहभागी असल्याचे पुरावे असताना कांग्रेसचे नेते "२६/११ का हमला RSS की साझिश" या रा. स्व. संघाला दोषी ठरवणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशनाला उपस्थित राहतात.

काँग्रेसचे तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी तर आता जाहिरपणे कबूल केले आहे की, मी हिंदू आतंकवाद शब्दाचा वापर करायला नको होता, मात्र पक्षाने सांगितले म्हणून केला. त्यांना ही हिंदूंना आतंकवादी ठरवण्याची थियरी कोणी सांगितली होती, याचा खुलासा कांग्रेस पक्ष का करत नाही? याच थियरीच्या आधारे सनातन संस्थेला ही खोट्या प्रकरणांत गोवण्यात आले होते. आमचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे; मात्र कोणत्याही प्रकरणात न्यायालयाने सनातन संस्थेला दोषी ठरवलेले नसतानाही, आम्हाला आतंकवादी संबोधणाऱ्या कांग्रेसच्या नेत्यांवर, तसेच संबंधित पोर्टलवर आम्ही बदनामीचे खटले दाखल करणार आहोत, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### SQAAF बाह्य मूल्यांकनात शेठ न. म. विद्यालय खारेपाटणला A+ श्रेणी

■ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव माध्यमिक शाळेचा मान

खारेपाटण (दैनिक संध्या) : गुरुनाथ तिरपणकर) : शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत झालेल्या बाह्य मूल्यांकनात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील खारेपाटण येथील शेठ न. म. विद्यालय व ज्युनिअर कॉलेज या प्रशालेला A+ श्रेणी प्राप्त झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये हा मान मिळवणारी ही एकमेव शाळा ठरली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत राज्य शाळा मानक प्राधिकरण (SQAAF) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२४-२५ मध्ये राज्यातील तब्बल १,०२,६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. त्यापैकी २०२५-२६ या वर्षासाठी १०,६४४ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली. बाह्य मूल्यांकनानंतर त्रयस्थ पक्ष (Third Party Assessment) मार्फत करण्यात आलेल्या परीक्षणात राज्यातील ४२९ शाळांना A+ श्रेणी मिळाली असून त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव माध्यमिक शाळा म्हणून शेठ नवीनचंद्र मफतलाल विद्यालय, खारेपाटण यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर (भा.प्र.से.) यांनी शाळेचे अभिनंदन केले आहे. तसेच खारेपाटण पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रवीण लोकरे, उपाध्यक्ष रघुनाथ राणे, सचिव महेश कोळसुलकर, विश्वस्त मंडळ यांनी प्राचार्य संजय सानप, पर्यवेक्षक संतोष राऊत, माजी विद्यार्थी समन्वयक कु. गौरी सारंगे यांसह सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. SQAAF अंतर्गत आवश्यक असलेले सर्व ऑनलाइन कामकाज नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेपेक्षा अधिक वेळ देत विशेष परिश्रम घेतले. या एकत्रित प्रयत्नांचे फलित म्हणून शाळेला A+ श्रेणी प्राप्त झाली आहे. या यशामुळे शेठ न. म. विद्यालय, खारेपाटण यांची शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील ओळख अधिक दृढ झाली असून सर्व स्तरांतून शाळेचे कौतुक होत आहे.

### ऑरेलियाने अनन्या पांडेसह केले एसएस’26 कलेक्शनचे अनावरण




पुणे (दैनिक संध्या) : आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेड कंपनीचा, स्त्रियांच्या एथिक कपड्यांचा भारतातील सर्वाधिक लोकप्रिय ब्रॅण्ड ऑरेलियाने स्प्रिंग समर’ २६ कलेक्शन बाजारात आणून भारतीय कपड्यांतील नवीनतम प्रवाहासांठी ‘गो-टू’ ब्रॅण्ड हे आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. #HameshaTrending या बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडेचा समावेश असणाऱ्या उत्साही अभियानाद्वारे हे कलेक्शन सर्वांपुढे आणले गेले आहे. ऑरेलिया हा फॅशनच्या बाबतीत सजग असणाऱ्या तरुण स्त्रियांसाठी नेहमीच पसंतीचा पर्याय राहिला आहे. आपल्या मूळ भारतीय सौंदर्याच्या कल्पना न विसरता नवीन प्रवाहांसोबत राहणे आवडणाऱ्यांना स्त्रियांमध्ये हा ब्रॅण्ड विशेष लोकप्रिय आहे. ज्या स्त्रियांना दररोज काळासोबत, आत्मविश्वासपूर्ण आणि विनासायास शैलीदार राहायला आवडते त्यांच्या व्यक्तिमत्वाचा गौरव ब्रॅण्डतर्फे या नवीन कलेक्शनद्वारे केला जात आहे.स्प्रिंग समर ’२६ कलेक्शनद्वारे भारतीय पोशाखांतील अगदी नवीन प्रवाह पुढे आणले गेले आहेत, अद्ययावत कुर्ता सिल्हुएट आणि फ्लुइड को-ऑर्ड सेट्सपासून खेळकर बाह्या, वैशिष्ट्यपूर्ण नेकलाइन्स, अधिक सौम्य रंग आणि नवीन प्रवाहानुरूप फुलांच्या डिझाइन्सपर्यंत या ऋतूसाठी चपखल असलेले सगळे प्रकार यात आहेत. सुतासारख्या घाम टिपून घेणाऱ्या वस्त्रप्रकारांत तसेच कमी वजनाच्या मिश्र वस्त्रप्रकारांत तयार करण्यात आलेले हे कलेक्शन आरामाला आणि ऋतूला अनुसरून पोशाखाला प्राधान्य देते. सहज बसतील असे फिट्स, तलम कापड आणि मिक्स-अँड-मॅच सेपरेट्स यांमुळे दैनंदिन वापराचे कपडे, खास प्रसंगी घालण्याचे कपडे, उन्हाळी ऋतूंतील उत्सवांसाठी घालण्याचे कपडे आणि प्रवासाचे कपडे यांत वैविध्य राखले जाण्याची निश्चिती होते. आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेडच्या टीसीएनएस डिव्हिजनचे चीफ एग्झिक्युटिव ऑफिसर अनंत दागा म्हणाले, “फॅशनच्या सातत्याने उत्क्रांत होत राहणाऱ्या क्षेत्रात काळाला धरून राहण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांना ऑरेलिया ब्रॅण्ड सातत्याने आपला वाटला आहे. या स्पष्ट स्थानावरून आम्ही भारतीय पोशाखांतील नवीनतम प्रवाहांसाठी ‘गो-टू डेस्टिनेशन’ ही ऑरेलियाची भूमिका अधिक दृढ करत आहोत. स्प्रिंग समर ’ट्वेंटीसिक्स कलेक्शन आणि #HameshaTrending अभियान ही आमची फॅशन क्षेत्रातील आघाडी भक्कम करण्याच्या दिशेने टाकलेली धोरणी पावले आहेत. त्याचबरोबर उपलब्धता, आरामदायीत्व आणि समावेशकता व्यापक प्रमाणावर देऊ करण्यासाठीही आम्ही हे कलेक्शन आणि अभियान आणले आहे. अनन्याच्या तरुण ग्राहकांशी असणाऱ्या घट्ट नात्यामुळे आमचे उद्दिष्ट अधिक व्यापक होते आणि ब्रॅण्डच्या वाढीच्या महत्त्वाकांक्षेशीही हे सुसंगत आहे.”

## ‘POVA Curve 2’ स्मार्टफोन विक्रीसाठी उपलब्ध

नवी दिल्ली (दै. संध्या) :




दीर्घ बॅटरी लाईफ आणि आकर्षक डिझाइन यांचा संगम असलेला ‘POVA Curve 2’ हा नवीन स्मार्टफोन आजपासून अधिकृतपणे विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. 8000mAh क्षमतेची मोठी बॅटरी आणि स्लिम वक्र डिझाइन ही या फोनची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

कंपनीच्या माहितीनुसार, POVA Curve 2 हा 7.42 मिमी जाडी आणि सुमारे 195 ग्रॅम वजन असलेला स्मार्टफोन असून, मोठ्या बॅटरीसहही हलका आणि स्लीक अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. दीर्घकाळ काम, प्रवास आणि सतत कनेक्ट राहण्याची गरज लक्षात घेऊन हा फोन विकसित करण्यात आला आहे.

या स्मार्टफोनमध्ये 144Hz वक्र AMOLED डिस्प्ले देण्यात आला असून, डोळ्यांचा ताण कमी करण्यासाठी आय-कम्फर्ट तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच सेगमेंटमधील पहिला ट्रिपल-चिपसेट स्मार्टफोन म्हणून याची ओळख असून, समर्पित सिग्नल चिपसेट (G1), वाय-फाय चिपसेट (SE1) आणि MediaTek D7100 प्रोसेसर यांचा समावेश आहे. 20 पेक्षा अधिक 5G बँड सपोर्ट आणि इंटेलिजेंट नेटवर्क स्विचिंगमुळे कमी नेटवर्क असलेल्या भागातही स्थिर कनेक्टिव्हिटी मिळते.

फोनमध्ये ELLA AI 2.0 प्रणाली देण्यात आली असून ती हिंदी, बंगाली, तमिळ, गुजराती आणि मराठी भाषांसह बहुभाषिक संवादासाठी सक्षम आहे. कॉल, व्हिडिओ मीटिंग आणि गेमिंगदरम्यान आवाज स्पष्ट राहावा यासाठी AI नॉईज रिडक्शन सुविधा देण्यात आली आहे.

हा स्मार्टफोन फ्लिपकार्ट आणि देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असून, निवडक बँक व NBFC भागीदारीतून ग्राहकांना ₹3,000 पर्यंत कॅशबॅक ऑफरही मिळणार आहे.

मोठी बॅटरी, प्रगत कनेक्टिव्हिटी, AI तंत्रज्ञान आणि आकर्षक डिझाइन यांच्या मिश्रणामुळे POVA Curve 2 हा तरुण आणि डिजिटल वापरकर्त्यांसाठी उपयुक्त पर्याय ठरणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

**POVA Curve 2 दोन व्हेरिएंटमध्ये उपलब्ध आहे :**

8GB + 128GB : ₹27,999
8GB + 256GB : ₹29,999

## देशाला धोका राहुल गांधींचा नव्हे तर मोदींचा : गोपाळ तिवारी




पुणे (दै. संध्या) :

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला संसदेत उत्तर देण्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी पळ काढतात, असा आरोप करत काँग्रेसचे वरिष्ठ राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर तथ्यहीन आरोप करून संसदीय मंत्री किरण रिजिजू देशाची दिशाभूल करत असल्याचेही त्यांनी म्हटले.

तिवारी म्हणाले की, नोटबंदी, पुलवामा हल्ला, मणिपूरमधील घटना, परराष्ट्र धोरण, चीन घुसखोरी तसेच अमेरिकन ट्रेड डील यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर संसदेत सविस्तर चर्चा करण्याचे धाडस सत्ताधारी भाजप-एनडीए सरकारने दाखवले नाही. गेल्या १२ वर्षांत एकही पत्रकार परिषद न घेतल्याचा आरोप करत त्यांनी सरकारवर पारदर्शकतेच्या अभावाचाही ठपका ठेवला.

देशातील जनतेने गेल्या दहा वर्षांचा मोदी कार्यकाळ अनुभवातून पाहिल्यानंतर काँग्रेसच्या जागांमध्ये वाढ झाली आणि भाजपच्या जागांमध्ये घट झाली, हे केंद्रीय मंत्री किरण रिजिजू विसरत आहेत का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

संसदेत घेतलेल्या निर्णयांचे समर्थन चर्चेतून करू न शकणारा सत्ताधारी पक्षच देशासाठी अधिक धोकादायक आहे; विरोधी पक्षनेते राहुल गांधी नव्हेत, असे ठाम मत गोपाळदादा तिवारी यांनी व्यक्त केले.

## Vivo ने V70 आणि V70 Elite लाँच केले

■ प्रीमियम डिझाइन, फ्लॅगशिप-लेव्हल परफॉर्मन्स, 50-मेगापिक्सेल Zeiss टेलिफोटो कॅमेरा आणि AI इमेजिंगसह, ₹45,999 पासून सुरू होणारे




नवी दिल्ली (दै. संध्या) :

Vivo India ने आज भारतात Vivo V70 आणि Vivo V70 Elite लाँच केले. हे स्मार्टफोन परिष्कृत डिझाइन, शक्तिशाली कामगिरी आणि प्रगत फोटोग्राफीचे परिपूर्ण संयोजन देतात. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे Vivo-Zeiss सह-इंजिनिअर इमेजिंग सिस्टम, ज्यामध्ये 50MP Zeiss नाईट टेलिफोटो कॅमेरा आहे[1]. हा कॅमेरा नाइस २.० लाईट आणि एआय स्टाईल पोर्ट्रेट तंत्रज्ञानाने परिपूर्ण आहे. यात या सेगमेंटमधील सर्वात मोठा १.३ सेमी सेन्सर देखील आहे, जो कमी प्रकाशातही आश्चर्यकारक स्पष्टता आणि बारीक तपशील सुनिश्चित करतो. V70 आणि V70 Elite झूम क्लॅरिटीसह 4K 60 फ्रेम्स प्रति सेकंदाला देखील समर्थन देतात, ज्यामुळे प्रत्येक फ्रेम रंग, खोली आणि तपशीलांनी समृद्ध आहे याची खात्री होते.

कार्यक्षमतेला पुढील स्तरावर घेऊन जाताना, नवीन Vivo V70 Elite मध्ये फ्लॅगशिप Snapdragon® 8S Gen 3 प्रोसेसर आहे, जो शक्तिशाली, कार्यक्षम आणि निर्बाध कामगिरी देतो. यात सेगमेंटच्या सर्वात पातळ बेझल[2] डिझाइनसह 1.5K अल्ट्रा क्लियर OLED डिस्प्ले आहे, ज्याचे माप फक्त 0.125 सेमी आहे. एरोस्पेस-ग्रेड ॲल्युमिनियम फ्रेम हातात प्रीमियम आणि संतुलित अनुभव प्रदान करते. भारत-विशिष्ट AI नवोपक्रमासाठी वचनबद्धता पुढे चालू ठेवत, Vivo V70 आणि V70 Elite मध्ये भारत-विशिष्ट AI होली पोर्ट्रेट[4] वैशिष्ट्य आहे. यामध्ये एआय मॅजिक वेदर[8] आणि एआय फ्लोरल ब्लेसिंग[8] सारख्या एआय-संचालित इमेजिंग वैशिष्ट्यांचा देखील समावेश आहे, जे विशेषतः त्यांची प्रामाणिकता जपून संस्मरणीय क्षणांना वाढविण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

विवो व्ही७० दोन आकर्षक रंग पर्यायांमध्ये उपलब्ध आहे - पॅशन रेड आणि लेमन येलो. ८ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटसाठी त्याची किंमत ₹४५,९९९ आणि १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटसाठी ₹४९,९९९ आहे. दरम्यान, विवो व्ही७० एलिट तीन आकर्षक रंग पर्यायांमध्ये उपलब्ध आहे - पॅशन रेड, सँड बेज आणि ऑथेंटिक ब्लॅक. ८ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटसाठी त्याची किंमत ₹५१,९९९, १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटसाठी ₹५६,९९९ आणि १२ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटसाठी ₹६१,९९९ आहे.

२६ फेब्रुवारीपासून, विवो व्ही७० आणि विवो व्ही७० एलिट विवोच्या अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट, अमेझॉन आणि सर्व भागीदार रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध असतील. ग्राहक आजपासून विवो एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स आणि पार्टनर रिटेल स्टोअर्समधून त्यांची प्री-बुकिंग करू शकतात. त्यांची खरेदी आणखी आकर्षक बनवण्यासाठी, ग्राहक खालील ऑफरचा लाभ घेऊ शकतात:

एसबीआय, कोटक, डीबीएस, अमेरिकन एक्सप्रेस, एचएसबीसी, आयडीएफसी, येस बँक आणि बँक ऑफ बडोदा कार्डवर १०% पर्यंत इन्स्टंट कॅशबॅक.

१०% पर्यंत अपग्रेड एक्सचेंज बोनस. १८ महिन्यांपर्यंत शून्य डाउन पेमेंट पर्याय. ७०% पर्यंत खात्रीशीर बायबॅक ₹४९९ पासून सुरू.

## भारतीय अन्न सेवा क्षेत्राला वाढीसाठी अनुपालन सुलभतेची आवश्यकता आहे

**आत्मनिर्भर भारतामध्ये प्रमुख योगदान देण्याची क्षमता**

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतीय कॉर्पोरेट अन्न सेवा ज्यामध्ये संस्थात्मक खानपान, कॉर्पोरेट कॅफेटेरिया, व्यवस्थापित अन्न सेवा तसेच कामाच्या ठिकाणी संघटित अन्न वितरण यांचा समावेश आहे, हे भारतातील एकूण अन्न सेवा बाजारपेठेतील सर्वात गतिमान क्षेत्रांपैकी एक आहे. नवीनतम उद्योग अंदाजानुसार, भारतातील अन्न सेवांमध्ये २०२४ ते २०२८ दरम्यान अंदाजे ८.१% च्या चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने (CAGR) वाढ होण्याची क्षमता आहे आणि कंपन्यांनी त्यांच्या सेवांचे व्यावसायिकीकरण केल्याने उद्योगाचा संघटित विभाग १३% पेक्षा जास्त दराने वाढण्याची शक्यता आहे. २०२८ पर्यंत, ग्राहकांच्या मागणीला मजबूत बळकटी देऊन आणि खाण्याच्या सवयींमध्ये संरचनात्मक बदलांमुळे बाजारपेठ जवळजवळ ७.८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

या संदर्भात, भारतातील सर्वात मोठी स्थानिक मालकीची कॉर्पोरेट अन्न सेवा कंपनी – रासेन्से सीईओ आणि एमडी श्री. संजय कुमार यांनी टिप्पणी केली की, "एवढ्या जलद वाढीसह, गुंतागुंतीचे अनुपालन आणि नियामक समस्या उद्भवतात. मोठ्या कंपन्यांचे अन्न सेवा व्यवसाय, तसेच लहान कंत्राटी केटरर्स, प्रत्येक नवीन ऑपरेशन ठिकाणी नियमांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात अडकतात. बहुतेक संस्थांमध्ये, विशेषतः लहान किंवा मध्यम-स्तरीय संस्थांमध्ये, नियमांचे पालन करणे ही संसाधन-वापराची प्रक्रिया आहे. विविध प्रकारच्या मंजुरी मिळवणे देखील वेळखाऊ असू शकते आणि प्रक्रिया कमकुवत नसल्यास ऑपरेशन्समध्ये अडथळा निर्माण करू शकते. याव्यतिरिक्त, वेगवेगळ्या राज्यांमधील ऑपरेशन्स जटिलतेची एक नवीन पातळी आणतात कारण वेगवेगळ्या राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील नियम भिन्न असतात आणि कॉर्पोरेट्सना वेगवेगळ्या स्थानिक मागण्यांनुसार त्यांच्या पद्धती निर्देशित करण्याची आवश्यकता असते.

अशा कायद्यांमुळे वाढीव अनुपालन खर्च देखील सूचित होतात, ज्याचा परिणाम उदयोन्मुख व्यवसायांवर अप्रमाणित पद्धतीने होतो. त्यात अनुपालनाचे अनेक स्तर आहेत आणि यामुळे स्थानिक बाजारपेठेत भारतीय खेळाडूंना काम करणे कठीण होते. परिणामी, संघटित कॉर्पोरेट केटरिंगच्या व्यवसायात आम्हाला कधीही भारतीय असे नाव देण्यात आले नाही. आणि ७५ वर्षांहून अधिक काळ परदेशी ब्रँड्सद्वारे नियंत्रित होते.

माझ्या अलिकडच्या चीन दौऱ्यादरम्यान, हे पाहून आश्चर्य वाटले की, सर्व-कार्यक्षम अन्न सेवा केंद्र सुरू करण्याच्या मंजुरी घेण्याच्या प्रक्रियेत, एक-खिडकी मंजुरी दिली जाते आणि काही दिवसांपेक्षा कमी वेळात मंजुरी दिली जाते. भारत २०४७ पर्यंत आत्मनिर्भर साध्य करण्याच्या मोहिमेवर असल्याने, अन्न सेवांसारख्या लोककेंद्रित क्षेत्रांमध्ये बॅक-एंड अनुपालनांची पुनरावृत्ती करणे आणि पुनर्संस्थापकीकरण करणे आवश्यक आहे कारण हे नवीन व्यवसाय स्थापन करण्यास अनुकूल असेल आणि अखेरीस माननीय पंतप्रधानांच्या दृष्टिकोनाला गती देऊ शकेल.”

व्यापकपणे, अन्न सेवा उद्योग अर्थव्यवस्थेत आणि पुरवठा-साखळी आधुनिकीकरणात एक प्रमुख खेळाडू आणि रोजगार प्रदाता म्हणून योगदान देऊ शकतो. योग्य नियामक चौकटी आणि सहाय्यक धोरणांसह क्षमता आणखी उघडल्या जाऊ शकतात ज्यामुळे या क्षेत्राला शाश्वत मार्गाने वाढण्यास मदत होऊ शकते आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**जाहीर नोटीस**

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव आळे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमचे आशील श्री. रमेश सहादु वाव्हळ, रा. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे :-

२) **मिळकतीचे वर्णन :-** तु. पुणे, पो. तु. नारायणगाव, ता. व पं. स. जुन्नर, जि. पुणे पैकी ग्रामपंचायत आळेचे हद्दीतील मिळकत.

अ)

| अ. नं. | ग. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) | २७५७ | ००.८७. | ०१.४७ |
| २) | २८१७ | ०१.०३<br>पो.ख. ००.०१<br>एकूण ०१.०४ | ०१.५७ |

येणे प्रमाणे वर्णनाची बागायत शेतजमीन त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू तसेच ग.नं. २७५७ मधील दोन बोअरवेल त्यावरील इले. मोटार, विजकनेक्शन पाईप लाईन तदंगभूत वस्तुंसह. त्यातील घर मिळकतीसह

ब) तु. पुणे, पो. तु. नारायणगाव, ता. व पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत आळेचे हद्दीतील मिळकत.

| सि.स.नं. | त्यांसी ग्रा.प.मि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| ६१६ | ०१५० | २४९.१० चौ.मी. |

येणे प्रमाणे वर्णनाची गावठाण हद्दीतील मिळकत.

२) वर कलम २अ मध्ये नमूद केलेल्या शेतजमिनी मुळच्या सहादु वाव्हळ या हिन्दू धर्मिय इसमाच्या मालकी वहिवाटीच्या असून सहादू व त्यांची पत्नी शांताबाई उभयतां मयत असून त्यांना आमचे आशील त्याचप्रमाणे संजय व सुनिता ही अपत्यं तसेच सहादू यांची मयत मुलगी नंदा हिचे वारस मनिषा व शुभांगी आहेत.

३) वर नमूद केलेल्या शेतजमिनींपैकी ग.नं. २७५७ ही जमीन तात्पुरते कौटुंबिक सोयीने आमचे आशील हे गेली कित्येक वर्षे, सालोसाल मेहनत-मशागत करून उत्पन्न घेत आले आहेत. एव्हढेच नव्हेतर सदरील ग.नं. २७५७ मध्ये आमचे आशिलांनी स्वकमाईतून व व्यापार उदिमांचे उत्पन्नामधून घरही बांधलेले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त जमिनीत आमचे आशिलांनी स्वकमाईतून दोन बोअरवेल घेतलेल्या असून त्यावर त्यांचे नावे विजकनेक्शन घेवून इले. मोटार बसवून पाईप लाईनने ग.नं. २७५७ ची संपुर्ण जमीन ओलीताखाली आणून बागायत केलेली आहे. तसेच ग.नं. २८१७ ही जमीन कौटुंबिक सोयीने आमचे आशिलांचे बंधू संजय हे गेली कित्येक वर्षे सालोसाल मेहनत-मशागत करून उत्पन्न घेत आलेले आहेत.

४) आमचे आशिलांच्या बहिणी सुनिता तसेच मंदा यांचे देखील विवाह होवून त्या आपापले सासरी नांदत असल्याने उपरोक्त जमिनीमध्ये विवाहापासून त्यांचा कुठलाही ताबा वहिवाट नव्हता व आजही नाही. एव्हढेच नव्हेतर मंदा मयत असून तिच्या मुली मनिषा व शुभांगी यांची वर नमूद जमिनीमध्ये कुठल्याही प्रकारचा ताबा वहिवाट नव्हता व आजही नाही.

५) वस्तुस्थिती वर नमूद केलेप्रमाणे असताना केवळ गावचे हक्कनोंदणीस मंदा हिच्या मुली मनिषा सचिन भागवत व शुभांगी योगेश दैवे तसेच सुनिता विजय वाळुंजकर यांची नावे गावचे हक्कनोंदणीस नमूद असल्याचा गैरफायदा घेवून उपरोक्त व्यक्ती वर नमूद जमिनीचे संदर्भात काही लोकांशी आमचे आशिलांचे परस्पर, सम्मतिविना हस्तांतर करण्याचे जोरदार प्रयत्नात असलेबाबत आमचे आशिलांस समजते. तसेच काही लोक तशा आशयाची बोलणी करीत असल्याचे आढळते.

६) वर नमूद केलेल्या मिळकतिंचे संदर्भात जुन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात रे.मु.नं. ३७०/२०२५ चा दिवाणी दावा चालू असून त्याचे कामकाज न्यायप्रविष्ट आहे. अशा परिस्थितीत सर्व लोकास तसेच संबंधीत व्यक्तीस अशी समज देणेत येते की, वर नमूद मिळकतिंचे संदर्भात वर नमूद बाबींची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. १२/०२/२०२६

(रमेश सहादु वाव्हळ)

श्री. कौस्तुभ पी. कर्पे
बी.एस.एल., एल.एल.एम.
ॲडव्होकेट "आशियाना",
"इंशान", ॐ शक्तीनगर, किल्ले शिवनेरी
पायथा, जुन्नर, जि. पुणे महा/१८३४/२०१४
मो. ७७६७०९३८६२

## Zscaler, Inc. आणि Bharti Airtel कडून AI व सायबर धोका संशोधन केंद्राची घोषणा

**सायबर लवचिकता मजबूत करण्यासाठी आणि विश्वसनीय AI स्वीकाराला गती देण्यासाठी बहु-हितधारक उपक्रम**

नवी दिल्ली (दै. संध्या) :




क्लाउड सुरक्षा क्षेत्रातील अग्रणी कंपनी Zscaler, Inc. आणि भारतातील प्रमुख दूरसंचार सेवा प्रदाता Bharti Airtel यांनी संयुक्तपणे AI & Cyber Threat Research Center – India स्थापनेची घोषणा केली आहे. भारताची सायबर लवचिकता बळकट करणे, महत्त्वाच्या क्षेत्रांचे संरक्षण करणे आणि सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्वीकाराला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. हे संशोधन केंद्र “In India, For India” या संकल्पनेवर आधारित असून, खाजगी क्षेत्र, सार्वजनिक संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि सरकार यांच्यातील सहकार्याला चालना देणार आहे. दूरसंचार, बँकिंग, ऊर्जा यांसारख्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक क्षेत्रांचे संरक्षण आणि कुशल सायबर मनुष्यबळ तयार करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे.

भारतामध्ये वेगाने वाढणाऱ्या डिजिटल परिवर्तनामुळे सायबर हल्ल्यांचा धोका वाढत आहे. Zscaler च्या ThreatLabz India संशोधन टीमने दरमहा लाखो घुसखोरी प्रयत्न नोंदवले असून, राष्ट्र-प्रायोजित सायबर हेरगिरी, शून्य-दिवस (zero-day) हल्ले आणि सार्वजनिक-खाजगी क्षेत्रांवरील वाढते आक्रमण याकडे लक्ष वेधले आहे.

Zscaler दररोज ५०० अब्जांहून अधिक व्यवहार प्रक्रिया करणाऱ्या Zero Trust Exchange™ प्लॅटफॉर्मद्वारे सायबर धोका गुप्त माहिती उपलब्ध करून देईल. Airtel IoT व मोबाईल ट्रॅफिकवरील सखोल निरीक्षण क्षमतेद्वारे संशयास्पद हालचालींची जलद ओळख पटविण्यास मदत करेल. पुढील काळात अन्य सार्वजनिक व खाजगी संस्थांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाणार आहे. एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष गोपाल विट्टल यांनी सांगितले की, “ग्राहक आणि देशाच्या डिजिटल परिसंस्थेचे संरक्षण ही आमची सातत्यपूर्ण बांधिलकी आहे. या भागीदारीतून सुरक्षित आणि सक्षम डिजिटल भारत घडविण्यास मदत होईल.” Zscaler चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी जय चौधरी म्हणाले, “भारताच्या डिजिटल विस्ताराच्या प्रमाणाला पारंपरिक सुरक्षा मॉडेल्स पुरेसे नाहीत. Zero Trust आर्किटेक्चरवर आधारित आधुनिक सुरक्षाव्यवस्था उभारणे अत्यावश्यक आहे.” या उपक्रमामुळे भारताच्या सायबर संरक्षण व्यवस्थेला बळकटी मिळण्यासोबतच डिजिटल आत्मनिर्भरतेकडे वाटचाल वेगाने होणार असल्याचे मानले जात आहे.

**महाराष्ट्र शासन**

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे- ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२१७६५
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- integratedpune.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ८७ सन २०२५-२०२६**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत/अनोंदणीकृत पात्र कंत्राटदारांकडून **बी-१/बी-२/क** निविदा नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

वरील निविदा सुचनेत समाविष्ठ असुन या निविदा सुचनेची संपुर्ण माहिती खालिल संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in

सही/-
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे-४११००१.

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6053

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई - निविदा सूचना**

केडगाव विभागातील पुढील कामांसाठी नामांकित नोंदणीकृत अनुभवी पुरवठादार तसेच ठेकेदार यांचे कडुन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| टि-09/ 2025-26 | Repairing and Maintenance work of Outdoor cable end kit and its allied works | रू.10.00 लाख |

कोरी निविदा संच महावितरणच्या संकेतस्थळावर **दि. 21.02.2026 ते 27.02.2026 पर्यंत** डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील. सदर निविदा शुल्क ऑनलाइन पध्दतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निवीदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरी काराने स्वतः कडे राखुन ठेवला आहे. अधिक माहितीसाठी व वेळोवेळी होणाऱ्या बदलांसाठी कंपनीचे संकेतस्थळ नियमित पहावे : **https://etender.mahadiscom.in/eatApp/..**

**पीआरओ क. BMTZ/ 216/2025-26** **कार्यकारी अभियंता, केडगाव विभाग**

## आयटी हब हिंजवडीत अवघ्या ४.३४ मिनिटांत पोलिस मदत



डायल ११२ ची धडाकेबाज कामगिरी

**पिंपरी (दै. संध्या) :**

संकटकाळात 'डायल 112' हा क्रमांक फिरवला की मदतीसाठी पोलिस किती वेळात पोहोचतात? या प्रश्नाचे उत्तर आता अधिकृत आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सरासरी 6 मिनिटांच्या आत पोलिस मदत घटनास्थळी पोहोचत असून, त्यात हिंजवडी पोलिस ठाणे प्रथम (4:34 मिनिटे), वाकड द्वितीय (4:39 मिनिटे) आणि दिघी तृतीय (5:01 मिनिटे) ठरले आहे. वाढती लोकसंख्या, आयटी पार्क, औद्योगिक वसाहती, निवासी विस्तार आणि महामार्गावरील वाहतूक या सर्व आव्हानांमध्येही पोलिसांचा हा जलद प्रतिसाद नागरिकांना दिलासा देणारा ठरत आहे. डायल 112 हेल्पलाइनवर जानेवारी ते डिसेंबर 2025 दरम्यान तब्बल 1 लाख 53 हजार 247 कॉल प्राप्त झाले. विविध गुन्हे (31,622), महिलांशी संबंधित तक्रारी (30,612), मानसिक ताणतणाव व त्रास (23,672), रस्ते अपघात (13,031), विविध चौकशी (15,234), माहितीविषयक कॉल (7,863), चोरी (6,349), किरकोळ वाद (6,276), ज्येष्ठ नागरिक (3,309), लहान मुलांशी संबंधित (1,958) आणि आगीच्या घटना (711) अशा विविध प्रकारांमध्ये पोलिसांनी तत्परतेने मदत पोहोचवली आहे. डिसेंबर महिन्यात सर्वाधिक 14,685 कॉल आले, तर मार्च (13,082) आणि सप्टेंबर (13,521) महिन्यांतही कॉलचे प्रमाण जास्त होते. शहरासह ग्रामीण भाग, महामार्ग आणि निर्मनुष्य परिसर अशा सर्व ठिकाणी या सेवेचा प्रभावी वापर झाल्याची नोंद पोलिस दप्तरी करण्यात आली आहे. 'डायल 112' वर आलेल्या प्रत्येक आपत्कालीन कॉलला आम्ही प्राधान्याने प्रतिसाद देतो. हिंजवडी पोलिस ठाण्याने 4:34 मिनिटांची सरासरी प्रतिसाद वेळ नोंदवत प्रथम क्रमांक मिळवला, याचे संपूर्ण श्रेय पोलिस आयुक्त व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रभावी मार्गदर्शनाला आणि त्यांनी आखून दिलेल्या काटेकोर नियोजनाला जाते. आयटी पार्क, औद्योगिक वसाहती आणि वाढती लोकसंख्या असूनही नियंत्रण कक्षाशी समन्वय, पीसीआर वाहनांचे सुयोग्य नियोजन आणि बीट मार्शलची सतत गस्त यामुळे आम्हाला तातडीने घटनास्थळी पोहोचता येते. नागरिकांचा विश्वास कायम राखण्यासाठी आणखी जलद आणि परिणामकारक सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. डायल 112 ही सेवा 24 बाय 7 कार्यरत आहे. कॉल कट झाल्यास तक्रारदाराशी पुन्हा संपर्क साधला जातो. तक्रारदाराचे समाधान होईपर्यंत कॉल बंद केला जात नाही. अत्याधुनिक वाहनांसह प्रशिक्षित अधिकारी व अंमलदारांचे पथक शहरातील प्रमुख चौकांत सतर्क असते. संकटाच्या क्षणी 'पोलिस वेळेवर येतात का?' हा नेहमीचा प्रश्न आता मागे पडताना दिसत आहे. आकडेवारीनुसार हिंजवडी, वाकड आणि दिघी या ठाण्यांनी सर्वाधिक जलद प्रतिसाद नोंदवला असून, इतर ठाण्यांचाही प्रतिसाद समाधानकारक असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# मुळशीत नवी 'राजकीय खिचडी'?

## संग्राम थोपटेंच्या 'आमचं ठरलंय'ने मोठी खळबळ

भाजप कार्यकर्त्यांनी आयोजित केलेल्या जाहीर सत्कार समारंभाला शरद पवार गटाचे दोन्ही सदस्य उपस्थित राहून त्यांनी सत्कार स्वीकारल्याने मुळशीत नवीन राजकिय समीकरणे जुळणार की काय हा चर्चेचा विषय बनला. त्यामुळे शरद पवार गटाच्या पाठींब्यावर भाजपचा एकमेव सदस्य सभापती पदावर दावा करणार की काय ? अशा चर्चा सुरू झाल्या. याला संग्राम थोपटे यांच्या " आमंच ठरलंय" या सूचक वक्तव्याने पुष्टी दिल्याने राजकीय वर्तुळात हा चर्चेचा विषय बनला आहे.



**पिंपरी (दै. संध्या) :**

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या भाजपा व शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांचा नागरी सत्कार सोहळा मुळशीचे माजी सभापती पांडुरंग ओझरकर युवा मंच व माण ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामपंचायत सभागृहात करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले माजी आमदार संग्राम थोपटे म्हणाले, आमचं ठरलंय... मुळशी पंचायत समितीचा सभापती हा महायुतीचाच होईल. कारण कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने मुळशीचा सभापती चिठ्ठीने होईल किंवा बहुमताने होईल. शासनाने सभापती निवडीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर याबाबत अधिकची स्पष्टता येईल. असे सूचक वक्तव्य करत राजकीय चर्चांना उधाण आणले. ते पुढे म्हणाले शेतकऱ्यांच्या जमिनीवर भूसंपादनाचे पडलेले एमआयडीसी व कॅनॉलचे शिक्के काढणे, वाढत्या नागरीकरणामुळे या भागातील सोसायट्यांच्या वीज, पाणी, रस्ते व कचरा व्यवस्थापन या समस्या सोडवण्यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे निश्चित पाठपुरावा करू. निवडणुकीत या भागांतील मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही. याप्रसंगी माण हिंजवडी गटातून विजयी झालेले भाजपाचे सदस्य शिवाजीराव बुचडे पाटील, हिंजवडी गणातून विजयी झालेल्या भाजपाच्या उमेदवार ऐश्वर्या वाघमारे, पिरंगुट गणातून विजयी झालेले राहुल पवळे व भूगाव गणातून विजयी उमेदवार दगडू करंजावणे तसेच भोरचे जिल्हा परिषद सदस्य पोपटराव सुके यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सभापती पांडुरंग ओझरकर, माण ग्रामपंचायतीच्या सरपंच अर्चना आढाव, मुळशी तालुका भाजपाचे अध्यक्ष हनुमंत चव्हाण ,भाजप नेते सुरेश हुलावळे, गंगाराम मातेरे ,दादाराम मांडेकर,संतोष मोहिते, पांडुरंग राक्षे, अमृता हिंगडे, आनंदा घोगरे, माजी उपसरपंच शशीकांत धुमाळ, सुनील भरणे, बापूसाहेब पारखी,युवा नेते सचिन आढाव,निलेश भोईर, युवा मोर्चाचे कार्याध्यक्ष प्रसाद खानेकर,मोरेश्वर घारे, साहेबराव जाधव, राहुल जाधव, युवराज पायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्तविक प्रसन्न ओझरकर यांनी तर आभार रवी बोडके यांनी मानले. यावेळी संतोष मोहिते यांनी सांगितले की माण गाव ज्या पक्षाच्या मागे उभे राहते त्यांचा विजय निश्चित होतो, असा इतिहास आहे.

विद्यमान आमदारांनी माणच्या प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने माणगाव राष्ट्रवादीला सोडून भाजपाच्या मागे खंबीरपणे उभे राहून भाजपला मोठे मताधिक्य दिले. त्यामुळे माजी आमदार थोपटे व नवनिर्वाचित सदस्यांची जबाबदारी आता वाढली असून माणच्या शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी तुम्ही मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करावा अशी आग्रही मागणी त्यांनी केली.


## महापालिकेत स्वेच्छानिवृत्ती घेण्याचा सिलसिला कायम

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. वैद्यकीय कारणामुळे त्यांनी निवृत्तीचा निर्णय घेतला आहे. त्या अर्जाला आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मंजुरी दिली असून, ते 28 फेब्रुवारीला निवृत्त होत आहेत. त्यांच्यासह काही अधिकाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज केले आहेत. प्रशासकीय राजवटीतील चार वर्षांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात खर्चिक विकासकामे व प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. ती कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्या बेसुमार कामे आणि खर्चाच्या प्रमाणावरून दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महापालिकेच्या कारभारावर थेट टीका केली होती. अधिकाऱ्यांवर दबाव टाकून कामांना मंजुरी दिल्याचा आरोपही त्यांनी जाहीरपणे केला होता. तसेच, विरोधक आणि सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी प्रशासकीय राजवटीतील कामांची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. प्रशासकीय काळात मंजुरी दिलेल्या सर्व कामांची लोकप्रतिनिधींच्या कार्यकाळात चौकशी होऊ शकते. चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची भीती अधिकाऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे महापालिकेचे अनेक अधिकारी स्वेच्छानिवृत्ती घेऊन पुढील आयुष्य आनंदीत घालविण्याच्या विचारात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे काही अधिकाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज केले आहेत. निवृत्ती घेणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, शहर अभियंता मकरंद निकम यांनी वैद्यकीय कारणांमुळे स्वेच्छानिवृत्ती घेतल्याचे सांगितले आहे. त्याचा अर्ज आयुक्त हर्डीकर यांनी स्वीकारला असून, ते 28 फेब्रुवारीला सेवानिवृत्त होत आहेत.

## नवी सांगवी, पिंपळे गुरव परिसरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट





जेंद्र जगताप यांनी केली कारवाईची मागणी

आमचा सामान्य नागरिकांच्या बाधकामांना विरोध नाही; मात्र व्यावसायिक स्वरुपाची अनधिकृत बांधकामे तात्काळ थांबवावीत. अनधिकृत व्यावसायिक बांधकामांना भाजपच्या बड्या नेत्यांचा वरदहस्त आहे, सामान्य नागरिकांना त्यांच्या जागा विकण्यास भाग पाडले जाते, तसेच भागीदारीच्या नावाखाली सदनिका उभारल्या आहे.

– राजेंद्र जगताप, माजी नगरसेवक

**पिंपरी (दै. संध्या) :**

नवी सांगवी, पिंपळे गुरव परिसरात अनधिकृत व्यावसायिक बांधकामांचा सुळसुळाट सुरु आहे. शहराच्या विविध भागात नियम धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरु असून ती तात्काळ भुईसपाट करावीत, अशी मागणी माजी नगरसेवक राजेंद्र जगताप यांनी केली आहे.


पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की पिंपळे गुरवच्या विविध भागांत कोणतीही परवानगी न घेता मजल्यावर मजले चढवणे, व्यावसायिक वापरासाठी इमारतींचे रूपांतर करणे, तसेच मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर गाळे उभारणे असे प्रकार सुरू आहेत. या अनधिकृत बांधकामांना राजकीय वरदहस्त मिळत असून मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांचा छुपा पाठिंबा असल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात बांधकामे होणे शक्य नसल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

विशेषतः निवडणूक काळात अशा बांधकामांना अधिक वेग आल्याचेही निदर्शनास आणण्यात आले आहे. ड प्रभाग अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मध्येही मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. या सर्व प्रकरणांचा मनपा प्रशासनाने तातडीने सर्व्हे करून नियमबाह्य बांधकामांवर जमीनदोस्त कारवाई करावी, तसेच संबंधित अधिकारी व दोषीवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी. सामान्य नागरिकांच्या बांधकामांना विरोध नाही. नवी सांगवी ह प्रभाग अंतर्गत प्रभाग क्रमांक ३१ मध्ये लोकप्रतिनिधीकडूनच सहा मजली अनधिकृत बांधकाम उभारण्यात आल्याचा आरोप आहे.

'तीन मजल्यापर्यंत बाधकाम केले असल्यास वरच्या सदनिका आम्हाला द्या, अन्यथा कारवाई करू.' असा दम काहीकडून दिला जात आहे. दरम्यान, कारवाई न झाल्यास राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन देण्यात येईल तसेच प्रसंगी न्यायालयात दाद मागितली जाईल, असेही राजेंद्र जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### प्रशासकीय काळातील कामांची श्वेतपत्रिका काढा; नगरसेविका सुलभा उबाळे आक्रमक



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेत प्रशासकीय काळातील कामांवरून जोरदार चर्चा रंगली. शिवसेनाच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी प्रशासकीय काळातील कामांची श्वेतपत्रिका काढा असे सांगत सभागृहाचे लक्ष वेधले. प्रशासकीय काळात झालेल्या कामांबाबत उबाळे यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. सभागृहात बोलताना सुलभा उबाळे यांनी प्रशासकीय काळातील सर्व कामांची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी केली. त्या म्हणाल्या की, त्या काळात अनेक कामे संशयास्पद पद्धतीने आणि घाईगडबडीत करण्यात आली आहेत. त्यामुळे या सर्व कामांची सखोल चौकशी होऊन संपूर्ण माहिती सभागृहासमोर मांडावी. यावेळी त्यांनी तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी घेतलेल्या निर्णयांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी केली. "आता अधिकाऱ्यांसमोर बजेटबाबत काही मुद्दे मांडले की 'पैसे नाहीत' अशी भूमिका घेतली जाते. मग प्रशासकीय काळात निधी कसा उपलब्ध झाला?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, तत्कालीन आयुक्तांना किमान एकदा तरी 'पाहुणे आयुक्त' म्हणून सर्वसाधारण सभेत बोलावून त्यांनी केलेल्या कामांबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी अनोखी मागणीही उबाळे यांनी केली. उबाळे यांच्या या मागणीमुळे सभागृहात काही काळ वातावरण तापले होते. प्रशासकीय काळातील निर्णय आणि कामांबाबत सविस्तर माहिती देण्याची मागणी आता अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.



### 'दर्यापती शिवराय' प्रदर्शनाची भव्य मेजवानी; शिवकालीन आरमाराचा इतिहास जिवंत

लोणावळा (दैनिक संध्या) : जयहिंद लोक चळवळ या सामाजिक संस्थेच्या वतीने लोणावळा शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 19 व 20 फेबुवारी रोजी दर्यापती शिवराय, मराठा आरमार व इतिहासकालीन युद्ध नौकांचे भव्य प्रदर्शन लोणावळा नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा क्रमांक 1 या ठिकाणी भरविण्यात आले आहे. याला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन लोणावळा नगर परिषदेचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, सर्व सभापती, नगरसेवक, नगरसेविका तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, जयहिंद लोक चळवळीचे प्रमुख निखिल कविश्वर, शुभम जोशी व त्यांचे सहकारी यांच्या उपस्थितीमध्ये आज सकाळी करण्यात आले. 19 व 20 फेबुवारी रोजी सकाळी 10 ते रात्री 8 वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्व वयोगटातील नागरिकांना पाहण्यासाठी मोफत खुले असणार आहे. इतिहास अभ्यासक कुमार गुरव यांनी या प्रदर्शनातील गलबते व लढाऊ जहाजे यांची माहिती उपस्थित मान्यवरांना दिली.

## अरविंद एज्युकेशन सोसायटीत विद्यार्थ्यांनी केली शिवगर्जना

**पिंपरी (दै. संध्या) :**

जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर इंग्लिश मिडीयम स्कुल, भारतीय विद्यानिकेतन, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कुल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी ढोल – ताशांच्या गजरात शिवगर्जना केली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी धैर्य, न्याय, नेतृत्व आणि मातृभूमीप्रेम यांचे महत्त्व जाणून घेतले. तसेच पोवाडे, नृत्य सादरीकरण करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, प्राचार्य शीतल मोरे, मुख्याध्यापिका आशा घोरपडे, नीलम पवार, इशिता परमार, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, सीमा हवालदार, प्रीती पाटील यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचे शौर्य, नेतृत्वगुण, दूरदृष्टी आणि उत्तम प्रशासन यावर प्रेरणादायी विचार व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या संकल्पनेविषयी आणि ऐतिहासिक किल्ल्यांविषयी माहिती सांगितली. तसेच शिवरायांचे गीत सादर केले. राजा शिवछत्रपती हे नाटक सादर केले. त्याचबरोबर शिवरायांची शिवस्तुती सादर केली. त्यामुळे शाळेतील वातावरण शिवमय झाले होते.

आरती राव यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांचा गनिमीकावा, युद्धतंत्र, अष्टप्रधान मंडळ, शिवराज्याभिषेक याबाबत माहिती सांगितली. प्रणव राव यांनी हिंदवी स्वराज्य निर्मिती करताना शिवरायांनी मावळ्यांना केलेले उपदेश, शेतीव्यवस्था याबाबत माहिती दिली. शिक्षिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांना शिवरायांच्या विविध गुणांविषयी माहिती सांगून त्यातील एक तरी गुण आपण आत्मसात केला पाहिजे, असे आवाहन केले.

शिवजयंतीचे औचित्य साधून घेतलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. 'हर ~ हर महादेव'च्या जयघोषात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भोसरी एमआयडीसीत ड्रोन क्लस्टरला वेग

**पिंपरी (दै. संध्या) :**

औद्योगिकनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला आता अध्याधुनिक तांत्रिक जोड मिळणार आहे. सूक्ष्म व मध्यम कंपन्या, वाहन उद्योग आणि उत्पादन क्षेत्राशी निगडित असलेल्या भोसरी एमआयडीसीत ड्रोन क्लस्टरच्या उभारणीला वेग आला असून, भविष्यात तांत्रिक आणि एआयच्या धर्तीवर भोसरीत मोठ्या गुंतवणुकीस चालना मिळणार आहे. नुकत्याच 40 कंपन्यांनी यासाठी इच्छा व्यक्त केली असून, 14 कंपन्यांनी गुंतवणुकीची तयारी केली आहे. पुण्यात नवे दोन क्लस्टर उभारण्यासाठी राज्य सरकाराच्या उद्योग मंत्रालयात प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यासाठी मराठा चेंबर ऑफ कॉर्मस, इंडस्ट्रीज अॅण्ड अॅग्रिकल्चरने अर्थात एमसीसीआयएने पुढाकार घेतला आहे. त्यापैकी ड्रोन आणि खाद्यपदार्थ असे दोन क्लस्टर असतील. त्यासाठी भोसरी आणि हडपसर या दोन ठिकाणांची निवड करण्यात आली होती. प्रत्यक्षात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे यासाठी जागाची चाचपणी केल्यानंतर हे दोन पर्याय समोर आले होते. त्यानंतर पिंपरी चिंचवड शहरातील औद्योगिक वातावरण आणि पायाभूत सुविधांचा विचार केल्यानंतर भोसरीत ड्रोन क्लस्टर आणि हडपसर या ठिकाणी फुड क्लस्टर उभारण्याची चाचपणी सुरू झाली आहे.

# "अब्रूनुकसानीचा दावा दाखल करा; पुरावे न्यायालयात देतो!"

### आमदार सुनील शेळके यांचे भाजपला खुले आव्हान



**पिंपरी (दै. संध्या) :**

तुम्ही माझ्या विरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा दाखल करा, मी न्यायालयात पुरावे सादर करतो; तसेच पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांकडे लेखी तक्रार करणार व अधिवेशन काळात मुख्यमंत्र्यांकडे सर्व पुरावे देणार, असा इशारा देत आमदार सुनील शेळके यांनी मावळ तालुक्यातील भाजप नेत्यांना पुन्हा एकदा खुले आव्हान दिले आहे.

सोमवारी वडगाव मावळ येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कृतज्ञता मेळाव्यात बोलताना आमदार शेळके यांनी तालुक्यातील भाजप नेत्यांनी उमेदवारांकडून ईव्हीएम मशीन हॅकच्या नावाखाली लाखो रुपये उकळले असल्याचा गंभीर आरोप करत गौप्यस्फोट केला होता. त्यानंतर माजी राज्यमंत्री संजय भेगडे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी पत्रकार परिषद घेऊन आमदार शेळके यांनी केलेले आरोप फेटाळून 8 दिवसांत आरोप सिद्ध करा, अन्यथा अबुनुकसानीचा दावा दाखल करण्याचा इशारा दिला होता.

यावर आज आमदार शेळके यांनी पत्रकारांशी बोलताना तुम्ही माझ्यावर अबुनुकसानीचा दावा दाखल करा, मी न्यायालयात पुरावे सादर करील, असे स्पष्ट करत पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांकडे लेखी तक्रार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याबाबतचे पुरावे देणार असल्याचे सांगितले. एकप्रकारे आमदार शेळके यांनी पुन्हा एकदा भाजपच्या स्थानिक नेत्यांना खुले आव्हान दिले आहे.

दरम्यान, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी आमदार शेळके यांच्यावर केलेल्या टीकेबाबत पत्रकार परिषदेत बोलताना मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राज खांडभोर यांनी आमदार शेळके किंवा राष्ट्रवादीच्या नेत्यांवर केलेल्या टीकेला जशाच तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा देऊन तालुक्याला प्रबळ विरोधकांची गरज आहे. त्यामुळे गणेश भेगडे यांनी राजकीय सन्यास घेऊ नये, असा टोलाही लगावला.

याप्रसंगी आमदार शेळके यांनी पुणे जिल्ह्यात ईव्हीएम हॅकर्सचे मोठे रॅकेट असल्याचा खळबळजनक दावा केला असून, हे हॅकर्स निवडणूक काळात काही उमेदवारांना हेरतात व ईव्हीएम मशीन हॅक करण्याच्या नावाखाली लाखो रुपयांचे डील करतात. यामध्ये विजय झाला तर पैसे त्यांना आणि पराभव झाला तर पैसे परत असा प्रकार असतो. अशाच हॅकर्सच्या टोळीला मावळातील भाजपचे नेते भेटले, उमेदवारांनी त्यांना पैसे द्यायचे, उमेदवार विजयी नाही झाला तर पैसे परत मिळणार असे डील केल्याचा आरोप शेळके यांनी केला.

### आरोप खोटे निघाल्यास, भरचौकात माफी मागेल!

आमदार शेळके म्हणाले, मी तालुक्याचा एक प्रतिनिधी असल्याचा भान ठेवून जबाबदारीने वक्तव्य करत असतो. ज्या उमेदवारांनी पैसे दिले त्यांच्याच जवळच्यांनी मला पुरावे दिले आहेत. मी पुराव्यानिशी बोलतो. मी खोटे आरोप करत नाही. आरोप खोटे निघाल्यास तुम्ही सांगतील त्या चौकात पाय धरून जाहीर माफी मागेल, असेही स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वृक्षारोपणातून वाढदिवस साजरा

■ दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणी जपण्याचा प्रयत्न

माळेगाव (दैनिक संध्या) : माळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते रामचंद्र खरात यांनी आपला वाढदिवस यावर्षी अत्यंत साधेपणाने साजरा केला. राज्यावर शोककळा पसरविणाऱ्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रामचंद्र खरात यांनी कोणताही वाढदिवस सोहळा न करण्याचा निर्णय घेतला. अजितदादांचे वृक्षांप्रती असलेले प्रेम आणि पर्यावरण संवर्धनाबाबतची त्यांची भूमिका लक्षात घेऊन,वाढदिवसानिमित्त केक कापणे किंवा औपचारिक कार्यक्रम न करता नगरपंचायत माळेगाव परिसरात वृक्षारोपण करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.दादांचे झाडांवर विशेष प्रेम होते.त्यांच्या आठवणी जपण्यासाठी आपण पर्यावरण जपण्याचा संकल्प करणे हीच खरी आदरांजली आहे असे मत रामचंद्र (पप्पू) खरात यांनी यावेळी व्यक्त केले. या उपक्रमात त्यांच्या सहकाऱ्यांनी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या कार्यकर्त्यांनी साधेपणाने उपस्थित राहून सहभाग घेतला.कोणताही दिखाऊ कार्यक्रम न करता समाजहिताचा संदेश देणारा हा उपक्रम नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.रामचंद्र खरात यांच्या या निर्णयामुळे सामाजिक बांधिलकी, पर्यावरणप्रेम आणि नेत्यांप्रती आदर व्यक्त करण्याची सकारात्मक परंपरा त्यांनी जपल्याचे बोलले जात आहे.

### पाणीपुरवठा पुन्हा कमी दाबाने येत असल्याने प्रशासनाकडे तक्रार

■ जनसेवक योगेश महाडीक यांनी दाखल केली तक्रार

बारामती (दैनिक संध्या) : बारामती नगरपालिका हद्दीतील रेणुका नगर व मुल्ला वस्ती परिसरात पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या संदर्भात योगेश महाडीक यांच्याकडे वारंवार तक्रारी येत असून, त्यांनी प्रशासनाकडे पुन्हा एकदा या गंभीर प्रश्नाची तक्रार नोंदवली आहे. काही दिवसांपूर्वीही या परिसरातील नागरिकांनी कमी दाबाच्या पाणी पुरवठ्याबाबत नाराजी व्यक्त केली होती.त्यावेळी योगेश महाडीक यांनी प्रशासनास जाब विचारत,तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. त्यांच्या या भूमिकेनंतर प्रशासनाने काही दिवस चांगल्या दाबाने व नियमित पाणीपुरवठा केला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र,पुन्हा एकदा पाणीपुरवठा कमी दाबाने होऊ लागल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे.विशेष म्हणजे सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून,पहिल्याच रोजाच्या दिवशी नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर जनसेवक योगेश भैय्या महाडीक यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करत,लवकरात लवकर संबंधित नेत्यांची व प्रशासनाची भेट घेऊन हा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले,अन्यथा प्रश्न मार्गी नाही लागला तर लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहेत.नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार असून, प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना करावी,अशी मागणी योगेश महाडिक यांच्याकडून केली गेली आहे.

### नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही : नगरसेविका पुजा घुंडरे

■ अन्नपूर्णा नगर ते के.के. हॉस्पीटल मार्गावर अवजड वाहनांना बंदीची मागणी

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदीतील प्रभाग क्र.३ मधील अन्नपूर्णा नगर ते के.के. हॉस्पीटल या अंतर्गत रस्त्यावरून अवजड वाहनांची वाढती ये-जा नागरिकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत असल्याने या मार्गावर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी स्थानिक नगरसेविका पुजा संजय घुंडरे यांनी केली आहे. ट्रक, कंटेनर व डंपरच्या सततच्या वाहतुकीमुळे अपघाताचा धोका वाढला असून परिसरातील रहिवासी, शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. याबाबत नगरसेविका पूजा संजय घुंडरे यांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. तसेच ध्वनी व वायू प्रदूषणात वाढ झाली असून रस्त्याची सुध्दा दुरवस्था होत आहे. यापूर्वी बसविण्यात आलेले स्पीड ब्रेकर अवजड वाहनांच्या दाबामुळे निकामी झाले असून त्या ठिकाणी नव्याने स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच 'नो एन्ट्री' फलक व उंची मर्यादा बॅरिकेट्स बसविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी नगरसेविका पूजा घुंडरे म्हणाल्या, नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. हा रस्ता अंतर्गत वस्तीतील असल्याने अवजड वाहनांना तात्काळ बंदी घालणे गरजेचे आहे." दरम्यान, प्रशासनाने या मागणीची दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.



### शिरूर शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन

शिरूर (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाणीचे जादूगार प.पू.गुरुदेव श्री रमणीक मुनीजी म.सा.यांच्या ४७ व्या दीक्षा दिनानिमित्त आणि शिरूर भूषण दानशूर व्यक्तिमत्त्व भामाशाह रसिकलालजी धारीवाल यांच्या जयंतीनिमित्त व कापड बाजार गणेश मित्र मंडळ यांच्या ९९ वर्षानिमित्त कापड बाजार गणेश मित्र मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात १३१ जणांनी रक्तदान केले. कापड बाजार मित्र मंडळाच्यावतीने घेण्यात आलेले रक्तदान शिबीर व राबवण्यात येत असलेले सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे यावेळी नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे म्हणाल्या. शिबीरास शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक नितीन पाचर्णे,नगरसेवक सागर नरवडे,नगरसेवक निलेश पवार, हिमानीश्री महाराज साहब,संघपती भरत चोरडिया,सुनील धाडीवाल,उद्योजक संदीप बिहाणी,धिरज संघवी,मयूर ओस्तवाल,श्रेयांस धाडीवाल आदींनी भेट दिली. शिरूर नगरपरिषद मंगलकार्यालयासमोर जैन पंचायत भवन येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरात सहभागी प्रत्येक रक्तदात्यास इस्त्री व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.शिरूर येथील ओम रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले.कापड बाजार मित्र मंडळाचे प्रितेश कोठारी व पंकज कोठारी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# पुणे जिल्हा परिषदेच्या २८ शाळांना अ+ श्रेणी

## पुरंदरमधील ३ शाळांचा मानाचा तुरा

▶ नाझरे सुपे (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या २८ शाळांनी राज्यस्तरीय शाळा गुणवत्ता मूल्यांकनात अ+ श्रेणी मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) यांच्या वतीने ही मूल्यांकन प्रक्रिया राबविण्यात आली. शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शाळेतील पायाभूत सुविधा, सुरक्षित व स्वच्छ वातावरण, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन या निकषांवर शाळांचे मूल्यमापन करण्यात आले.

या यशामध्ये पुरंदर तालुक्यातील मठवाडी, चांबळी आणि कदमवस्ती येथील तीन शाळांचा समावेश असून, ग्रामीण भागातील शाळांनी दर्जेदार शिक्षण देत राज्यस्तरावर आपली छाप पाडली आहे. विशेष म्हणजे या शाळांनी ई-लर्निंग, स्मार्ट टीव्ही/प्रोजेक्टरचा वापर, शैक्षणिक साहित्यनिर्मिती, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ आणि पालक सहभाग या बाबींमध्ये उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

तालुकानिहाय पाहता खेड – ८, आंबेगाव – ४, भोर – ३, शिरुर – २, बारामती – २, जुन्नर – २, मावळ – २, मुळशी – १ आणि हवेली – १ अशा एकूण २८ शाळांनी अ+ श्रेणी मिळवली आहे. ही संख्या जिल्हा परिषद शाळांमधील वाढत्या गुणवत्तेचे प्रतीक मानली जात आहे.

जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील यांनी सांगितले की, "अधिकारी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हे यश मिळाले आहे. गुणवत्ता वृद्धीच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे."



> हे यश केवळ शाळांचे नसून संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या दिशेने उचललेले हे एक भक्कम पाऊल ठरले आहे.
>
> **— श्री. गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद**

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे तसेच शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी संबंधित गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील काळात अ+ पेक्षा अधिक उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन केले.

दरम्यान, जिल्हा परिषद शाळांमध्ये 'विद्यार्थी केंद्रित अध्यापन', 'मूल्याधिष्ठित शिक्षण', 'क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांवर भर' तसेच 'शाळा-समुदाय सहभाग' या बाबींवर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षणाची संधी उपलब्ध होत असून, जिल्हा परिषद शाळांविषयी पालकांचा विश्वासही अधिक दृढ होत असल्याचे चित्र आहे.

पुरंदर तालुक्यात शिक्षण विभागाच्या सातत्यपूर्ण नियोजन, शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि शिक्षकांच्या बांधिलकीमुळे शैक्षणिक गुणवत्ता अधिक सक्षम व परिणामकारक होत आहे. शाळांमध्ये विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धती, डिजिटल साधनांचा वाढता वापर, नियमित शैक्षणिक आढावा बैठकांमधून प्रगतीचे मूल्यमापन तसेच पालक-शाळा समन्वय या माध्यमातून सकारात्मक बदल घडत आहेत.

विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता कौशल्याधारित, मूल्याधिष्ठित आणि स्पर्धात्मक शिक्षण देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही र्जेदार आणि आधुनिक शिक्षणाची समान संधी मिळावी, यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

भविष्यात पुरंदर तालुक्यातील सर्व शाळांनी गुणवत्ता वृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न करत अधिकाधिक शाळांनी अ+ श्रेणी प्राप्त करावी, अशी अपेक्षा आहे. शिक्षण क्षेत्रातील ही उन्नती तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील यांनी सर्व शाळांचे, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढील काळातही गुणवत्ता वृद्धी, नवकल्पना आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणावर भर देत जिल्हा परिषद शाळांनी राज्यात आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### पुरंदर तालुक्यातील अ+ श्रेणी मिळवणारी शाळा

(१)- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मठवाडी (ता. पुरंदर)
(२)- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चांबळी (ता. पुरंदर)
(३)- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कदमवस्ती (ता. पुरंदर)



# नीरेत दहावीच्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा

## नीरा केंद्रात २५९ परिक्षार्थी विद्यार्थी

▶ नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा येथील केंद्रात शुक्रवारी ( दि.२०) दहावीची परिक्षा सुरळीत सुरू झाली. नीरा केंद्रात २५९ परिक्षार्थी विद्यार्थी परिक्षा देत आहेत. महात्मा गांधी विद्यालय व सौ.लि. रि. शहा कन्या विद्यालय, बा. सा. काकडे विद्यालय व ज्यो.हा. गुळूंचे या शाळेतील दहावीच्या परिक्षार्थी विद्यार्थ्यांना ग्रामस्थांसह केंद्रप्रमुख, शिक्षकांनी गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी रयतेचे स्कुल कमिटीचे अध्यक्ष संतोष गांधी, ॲड. आदेश गिरमे, विजय पवार, रेणुका कोठडीया, तनुजा शहा, योगेंद्र माने, केंद्र प्रमुख कैलास नेवसे, कर्नलवाडीचे माजी उपसरपंच भरत निगडे, पोलिस पाटील राहुल शिंदे महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य अनिल धुमाळ, सौ. लि. रि. शहा कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मला माने यांच्यासह शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.

शुक्रवारी (दि.२०) सकाळी अकरा वाजता मराठी विषयाच्या पेपरने दहावीची परिक्षा सुरळीत सुरू झाली. या केंद्रात ११ वर्ग खोल्यांमधुन बैठक व्यवस्था करण्यात आली होती. महात्मा गांधी विद्यालयातील ६८ विद्यार्थी, सौ.लि.रि.शहा कन्या शाळेतील ९२ विद्यार्थीनी, पिंपरे (खुर्द) येथील बाबालाल काकडे विद्यालयातील ४४ विद्यार्थी व गुळूंचे येथील ज्योतिर्लिंग हायस्कुलचे ५५ विद्यार्थी असे एकूण २५९ विद्यार्थी असून त्यामध्ये मुले १३९ व १२० मुली नीरा केंद्रावर परिक्षा देत आहेत. शुक्रवार दि.२० फेब्रुवारी रोजी सुरु झालेली ही परिक्षा बुधवार दि.१८ मार्च पर्यंत या केंद्रात सुरू राहणार आहे.

यंदा ही शासनाने दहावी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबविले असून विद्यार्थ्यांनी कोणतेही दडपन न घेता अतिशय निर्भिड व स्वच्छंदी वातावरणात परिक्षा पार पाडावी असे आवाहन नीरा केंद्राचे केंद्रप्रमुख व बा.सा. काकडे विद्यालय पिंपरेचे (खुर्द) मुख्याध्यापक कैलास नेवसे यांनी विद्यार्थ्यांना केले. या परिक्षा केंद्रावर दक्षता कमेटीची नेमणूक केली आहे. दक्षता कमेटीचे सदस्य मोहंम्मदगौस आतार, भरत निगडे आदींनी भेट दिली. परिक्षा काळात प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथकाचे प्रमुख शिवाजी चव्हाण उपस्थित होते. प्रत्येक वर्गखोलीत पुरेसा उजेड असुन, सि.सी.टिव्ही बसविलेले आहेत. शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होते. ही परिक्षा भयमुक्त वातावरणात संपन्न व्हाव्यात व परिक्षा काळात कोणत्याही अनुचीत प्रकार घडु नये म्हणून दोन पोलिस कर्मचारी व होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते.

## प. पु. प्रदिपजी मिश्रा यांच्या श्री शिव महापुराण कथेचे आयोजन



▶ शिरूर (दै. संध्या)

शिरूर,ता.शिरुर,जि.पुणे येथे दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ ते २ मार्च दरम्यान भव्य"श्री शिव महापुराण कथा" आयोजन करण्यात आले असून, या धार्मिक पर्वात शिवभक्तांनी सहभागी होऊन शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन उद्योगपती प्रकाशभाऊ धारीवाल व युवा उद्योजक आदित्य धारीवाल यांनी आयोजित पत्रकार परिषदेवेळी केले. यावेळी आयोजक प्रसिद्ध उद्योगपती व पी.आर फाऊंडेशनचे प्रकाशभाऊ धारीवाल,युवा उद्योजक आदित्य धारीवाल,माजी नगरसेवक विजय दुगड,नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहुल पाचर्णे,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक रविंद्र ढोबळे,माजी सरपंच अरुण घावटे,विठ्ठल घावटे यांसह आजी माजी नगरसेवक व मान्यवर उपस्थीत होते. श्री शिव महापुराण कथा कार्यक्रम उद्योगपती स्व. रसिकलाल धारिवाल नगरी रामलिंग रोड,शिरुर जिल्हा पुणे येथे मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ ते दिनांक २ मार्च २६ या कालावधीत दुपारी एक ते सायंकाळी चार या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या पवित्र कथावाचनाचा शुभयोग आंतरराष्ट्रीय कथा वाचक प.पू.पंडित प्रदीपजी मिश्रा (सिहोर वासी) यांच्या अमृतवाणीतून लाभणार आहे.

## वाल्ह्याच्या वाल्मिकी शाळेत दहावीच्या परिक्षा शांततेत सुरु

▶ वाल्हे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परिक्षा वाल्हे ( ता. पुरंदर ) येथील महर्षी वाल्मिकी विध्यालयात शांततेत व सुव्यवस्थेत सुरु असल्याची माहिती जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप यांनी दिली . यावेळी वाल्हे केंद्र (क्र.१३६४) असलेल्या वाल्मिकी विध्यालयासह ,न्यू इंग्लिश स्कूल जेऊर ,डॉ.पतंगराव कदम विध्यालय दौंडज ,वाघेश्वरी माध्यमिक विध्यालय पिंगोरी ,न्यू इंग्लिश स्कूल मांडकी तसेच हरणी माध्यमिक विध्यालयातील एकूण २७५ विध्यार्थ्यांनी आज शुक्रवारी ( २० फेब्रुवारी ) दहावीच्या बोर्ड परीक्षेतील मराठी विषयाचा पहिला पेपर दिला आहे. यावेळी परिक्षा केंद्राबाहेर सर्वच विध्यार्थ्यांचे स्वागत जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे यांसह वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ माजी सभापती गिरीश पवार तसेच अमोल खवले सम्राज्ञी लंबाते दादासाहेब मदने उमेश पवार धनंजय भुजबळ अमित पवार सेवानिवृत्त जवान सचिन कदम श्री भैरवनाथ मंदिराचे पुजारी सचिन आगलावे सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र भुजबळ रवी लंबाते संजय खवले आदी मान्यवरांच्या हस्ते शालेय पेन व पेन्सिल देऊन करण्यात आले.


# पुरंदरमध्ये 'लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी' स्थापन करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

▶ पुरंदर (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील घेरा पानवडी या ग्रामीण व दुर्गम भागात 'लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी' या बहुविद्याशाखीय विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले आहे. दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रात या प्रस्तावाकडे केवळ प्रशासकीय दृष्टीकोनातून न पाहता सामाजिक व आध्यात्मिक परिवर्तनाच्या दृष्टीने विचार करावा, अशी विनंती करण्यात आली आहे. घेरापानवडी फाउंडेशन तसेच 'लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी' निर्माण कृतिसमितीमार्फत २५ फेब्रुवारी २०२२ पासून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे निवेदनात नमूद आहे.

निवेदनात विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी निवेदनात म्हटले आहे की, सध्याच्या काळात भौतिक प्रगतीसोबत मानसिक अस्थिरता, नैतिक अधोगती, व्यसनाधीनता आणि सामाजिक ताणतणाव वाढत आहेत. त्यामुळे करुणा, समता,




शांतता आणि विवेक यांवर आधारित मूल्याधारित शिक्षणाची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

भगवान गौतम बुद्ध यांच्या मध्यममार्ग, अहिंसा आणि समत्वाच्या तत्त्वज्ञानाचा आजच्या समाजजीवनात व्यापक उपयोग होऊ शकतो. प्रस्तावित विद्यापीठ हे सामाजिक परिवर्तन आणि नैतिक पुर्नजागरणाचे केंद्र ठरू शकते, असा दावा त्यांनी निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, या विद्यापीठामुळे घेरा पानवडी परिसरातील आर्थिक व शैक्षणिक विकासाला चालना मिळेल, स्थानिक युवकांना रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होईल आणि ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा वाढतील, असेही नमूद करण्यात आले आहे.

राज्य शासनाने या प्रस्तावावर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी केली आहे.

# महापौरपदी नारायण चौधरी तर उप- महापौर पदी मोमीन अब्दुल तारिक बारी

▶ भिवंडी (दै. संध्या)

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर व उप- महापौर पदाची निवडणूक पिठासिन अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ (भा.प्र.से.)यांच्या अध्यक्षतेखाली स्व.विलासराव देशमुख सभागृह येथे संपन्न झाली. या प्रसंगी महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर (भा.प्र. से.) तसेच मनपाचे नगरसचिव अजय पाटील हे उपस्थित असल्याने, त्यांच्या उपस्थितीत सदरची निवडणूक पार पडली.




भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी १० उमेदवारी अर्ज दाखल झाले होते, त्यातील ६ उमेदवारांनी सदर दिवशी आपले अर्ज मागे घेतले. उर्वरित ४ अर्जांपैकी २ अर्ज एकाच उमेदवाराचे होते. अंतिम उमेदवार नारायण चौधरी, विलास पाटील, स्नेहा पाटील यांचे मध्ये निवडणूक घेण्यात आली, यामध्ये नारायण चौधरी यांना ४८ मते, विलास पाटील यांना २५ मते तरश स्नेहा पाटील यांना १६ मते पडली. त्यामुळे नारायण चौधरी यांची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदी निवड झाल्याचे पिठासिन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ (जिल्हाधिकारी ठाणे) यांनी घोषित केले. तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या उप- महापौर पदासाठी ०७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते, त्यातील ०२ उमेदवारांनी सदर दिवशी आपले अर्ज मागे घेतले,तर ०१ अर्ज अवैध झाला. उर्वरित ४ अर्जांपैकी २ अर्ज एकाच उमेदवाराचे होते, अंतिम उमेदवार जावेद दळवी, मोमीन अब्दुल तारिक बारी, सुहास नकाते यांचे मध्ये निवडणूक घेण्यात आली, यामध्ये जावेद दळवी यांना २५ मते, मोमीन अब्दुल तारिक बारी यांना ४३ मते तर सुहास नकाते यांना २१ मते पडली. त्यामुळे मोमीन अब्दुल तारिक बारी यांची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उप-महापौर पदी निवड झाल्याचे पिठासिन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ (जिल्हाधिकारी ठाणे) यांनी घोषित केले. महानगरपालिका महापौर व उपमहापौर यांच्या निवडीनंतर पिठासिन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ (जिल्हाधिकारी ठाणे) यांनी विजयी महापौर व उप-महापौर यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. भिवंडी शहराच्या विकासासाठी गेल्या अनेक वर्षापासून प्रशासकीय राजवट होती. त्यामुळे भिवंडीतील नागरिक या निवडीमुळे भिवंडीच्या विकासासाठी नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर नेमकं काय नियोजन करून भिवंडीचा विकास साध्य करतील याची प्रतीक्षा मात्र नागरिकांना लागली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### महिला आरोग्य विषयक जनजागृती फॅशन शो संपन्न; विजेत्यांना अल्बम सॉन्गमध्ये संधी

पिंपरी (दैनिक संध्या) : अलीकडे फॅशन शोचे पर्व फुटलेले आहे. तीन वर्षांच्या बालकांपासून पन्नाशी गाठलेल्या महिला - पुरुषांचेही फॅशन शो होत असतात. या सर्व फॅशन शो पेक्षा एक आगळा - वेगळा, सामाजिक बांधिलकी आणि महिला आरोग्य जनजागृती घडवणारा फॅशन शो कशिश सोशल फाउंडेशनच्या सहकार्याने स्वप्नील गोगावले एन्टरटेनमेंट आणि आई फाऊंडेशन यांच्या वतीने एलप्रो मॉल,चिंचवड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मिस / मिसेस / मिस्टर आणि किड्स अशा विभागात ही स्पर्धा संपन्न झाली. यावेळी डॉ. महेश थोरवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अर्चना माळी, स्वप्नील गोगावले,डॉ.अजितसिंह पाटील, राज रणदिवे,अर्चना माघाडे,निलाक्षी जाधव,केतकी शिरबावीकर,स्मिता मधुकर,डॉ.स्मिता बारवकर आई फाउंडेशनच्या सई वढावकर, कशिश सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष, पुण्याचे पॅडमॅन योगेश पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कशिश प्रॉडक्शन्स चे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर ओम जगदाळे ने देखिल रॅम्प वॉक केला. फॅशन शो विषयी माहिती देताना योगेश पवार म्हणाले, आपल्या सामाजिक कर्तव्याच्या जाणिवेतून कशिश सोशल फाउंडेशनच्या वतीने मासिक पाळी या अतिशय महत्वाच्या आणि नाजुक विषयांवर जनजागृती करण्याचे काम केले जाते. या उपक्रमाचा भाग म्हणून सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात येणार आहे. फाउंडेशनच्या वतीने आजपर्यंत काश्मिर खोऱ्यासह पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या दुर्गम भागात गरजू महिलांना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले आहे. या शो मधूनही तीच जागृती आम्ही करत आहोत. स्वप्नील गोगावले म्हणाले, , मी अनेक फॅशन शो बघितले, उपस्थित राहिलो आहे, मात्र हा मिस / मिसेस/ मिस्टर आणि किड्स फॅशन शो एक अनोखा अनुभव माझ्यासाठी होता, कारण पुण्याचे पॅडमॅन अशी ओळख निर्माण केलेल्या योगेश पवार यांच्या संकल्पनेतून हा शो महिलांच्या आरोग्य विषयक जनजागृती आणि सुरक्षा या विषया भोवती गुंफन्यात आला होता. या स्पर्धेतील विजेत्यांना आम्ही आमच्या आगामी अल्बम सॉन्ग मध्ये संधी देणार आहोत.

### सोनाक्षी बत्रा आणि फर्मान हैदर म्हणाले, “हा संपूर्ण टीमचा विजय आहे.”



पुणे (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका, राहुल कुमार तिवारी निर्मित ‘जगद्धात्री’ने नुकतेच 100 भाग पूर्ण केले असून हा सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या मालिकेत स्त्रियांच्या दुहेरी, संघर्षशील आणि अंतर्गत शक्तीची प्रेरक कहाणी दाखवली जात आहे. जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) हिच्याकडे तिच्याच लोकांकडून दुर्लक्ष होते, तिचा आवाज दाबला जातो आणि तिला पुरेसे प्रेमही मिळत नाही. परंतु जेव्हा ती तिच्या गुप्त ‘एजंट जेडी’ या रुपात प्रवेश करते तेव्हा ती एक निर्भय, धारदार आणि अविरत काम करणारी अंडरकव्हर ऑफिसर बनते. तिच्या या वेगळ्या आणि प्रभावी कथानकाने प्रेक्षकांना खूप भुरळ घातली असून त्यांना मालिकेशी घट्ट जोडून ठेवले आहे. हा मोठा पल्ला साजरा करण्यासाठी अलीकडेच मालिकेच्या सेटवर केक कापण्याचा छोटा समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्य कलाकार सोनाक्षी बत्रा, फर्मान हैदर, सयंतानी घोष आणि इतर कलाकारांनी एकत्र येऊन आनंदाचा हा क्षण मोठ्या उत्साहात साजरा केला. त्यामुळे मालिकेच्या 100 व्या भागाचा हा सोहळा खरोखरच खास आणि संस्मरणीय ठरला. हा पल्ला गाठल्याचा आनंद व्यक्त करताना सोनाक्षी बत्रा म्हणाली, “‘जगद्धात्री’चे 100 भाग पूर्ण करणे ही माझ्यासाठी खरंच खूप खास गोष्ट आहे. हा आम्हां सर्वांसाठी सुंदर टप्पा आहे. प्रेक्षकांनी आम्हांला दिलेले प्रेम आणि प्रतिसाद मनाला खूप भावतो. कथेशी आणि पात्रांच्या प्रवासाशी प्रेक्षक जोडले जाताना पाहणे आमचे सर्व श्रम सार्थकी लावते. आमच्या प्रयत्नांची दखल घेतली जात आहे याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे. माझ्या सहकलाकारांना आणि संपूर्ण टीमला मनापासून धन्यवाद कारण त्यांनीच मला नेहमीच पाठिंबा दिला. हा टप्पा आमच्या सर्वांचा आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो आमच्या प्रेक्षकांचाही आहे ज्यांच्यामुळे हे शक्य झाले.” शिवायची भूमिका साकारणारा फर्मान हैदर म्हणाला, “‘जगद्धात्री’ने 100 भाग पूर्ण केले आहेत! हा आमच्यासाठी अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे. सेटवरील प्रत्येक दिवसाने मला एक अभिनेता म्हणून खूप काही शिकवले आहे आणि त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. प्रेक्षकांनी आम्हांला ज्या पद्धतीने स्वीकारले आणि प्रेम दिले त्यामुळे हा टप्पा आणखी खास झाला आहे.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर : समाजप्रबोधनाचा ध्यास

**एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात ‘दर्पण’ आणि ‘दिग्दर्शन’ या नियतकालिकांच्या माध्यमातून समाज प्रबोधनासाठी लेखणीचा वापर प्रबोधनाचे आयुध म्हणून करणारे झंझावाती संपादक तसेच अनेक भाषांची जाण व विविध विषयांमध्ये तज्ज्ञ असणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य बाळशास्त्री जांभेकर. अध्यापक, पत्रकार, संपादक, लेखक, संशोधक आणि कृतीशील समाजसुधारक व समाज प्रबोधनकार अशा अनेक भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या. आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीमध्ये त्यांचे योगदान मोलाचे असून त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला हा थोडक्यात मागोवा...**

वृषाली मिलिंद पाटील, सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर



(दै. संध्या)

**कौटुंबिक पार्श्वभूमी :** २० फेब्रुवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात पोंभूर्ले येथे बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील उत्तम संस्कृत पंडित व पुराणिक होते, तर आई सगुणाबाई प्रेमळ, धर्मनिष्ठ आणि संस्कारक्षम होत्या. पतीसोबत काशी यात्रेला असताना १८३० च्या सुमारास त्यांचे निधन झाले. बाळशास्त्रींना दोन बहिणी व एक भाऊ अशी तीन भावंडे होती.

**बालपण व प्राथमिक शिक्षण:** त्या काळात पोंभूर्ले येथे प्राथमिक शाळा नसल्याने बाळशास्त्रींचे शिक्षण वडिलांच्या मार्गदर्शनाखाली घरीच झाले. जन्मजात बुद्धिमत्ता, अफाट स्मरणशक्ती आणि अभ्यासाची आवड हे त्यांचे विशेष गुण होते. सकाळी लवकर उठून वाचन, त्यानंतर दैनंदिन आवराआवर अशी शिस्तबद्ध दिनचर्या त्यांनी लहानपणापासून अंगीकारली होती. एकपाठी अभ्यासामुळे पंचक्रोशीत त्यांची ‘बालबृहस्पती’ म्हणून ओळख निर्माण झाली.

मराठी वाचन-लेखन, व्यावहारिक गणित, तोंडी हिशेब, संत रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंत यांच्या निवडक कविता, रामायण, महाभारत, बखरी आणि चरित्रकथा यांमध्ये ते आठव्या वर्षीच पारंगत झाले. पुढे वेदपठण, संस्कृत स्तोत्रे, भगवद्गीता, अमरकोश, लघुकौमुदी, पंचमहाकाव्ये यांचे अध्ययन त्यांनी बाराव्या वर्षापर्यंत पूर्ण केले.

**मुंबईतील शिक्षण व प्रारंभिक वाटचाल :** वयाच्या तेराव्या वर्षी पुढील शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. त्यांची बुद्धिमत्ता सदाशिव छत्रे यांच्या लक्षात आल्यामुळे इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. १८२५ मध्ये ते सोसायटीच्या इंग्रजी शाळेत दाखल झाले. इंग्रजीचा अभ्यास करतानाच त्यांनी गणित व अन्य विषयांत प्रयत्नाने प्रावीण्य मिळवले. त्यामुळे अवघ्या तीन वर्षांतच, १८२९ मध्ये त्याच शाळेत त्यांची गणित अध्यापक म्हणून दरमहा १५ रुपयांवर नियुक्ती झाली.

**मुंबई नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीत प्रमुख जबाबदारी :** २० फेब्रुवारी १८३० रोजी त्यांनी मुंबई नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस यांना इंग्रजीत अर्ज सादर केला. या अर्जात मराठी, संस्कृत, इंग्रजी भाषांवरील प्रभुत्वासह गुजराती, बंगाली व फार्सीचे प्राथमिक ज्ञान असल्याचा त्यांनी उल्लेख केला होता. आत्मविश्वासपूर्ण अर्ज आणि गुणवत्तेच्या जोरावर अवघ्या १८ व्या वर्षी त्यांची ‘डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी’ म्हणून नियुक्ती झाली.

**प्राध्यापक म्हणून ठसा :** बाळशास्त्री यांची बुद्धिमत्ता, निष्ठा व कर्तृत्व पाहून दोन वर्षांतच त्यांची नेटिव्ह सेक्रेटरीपदी नेमणूक झाली. १८३५ मध्ये जगन्नाथ (नाना) शंकरशेट यांच्या पुढाकाराने एल्फिन्स्टन कॉलेज सुरू झाले. तेथे दरमहा १५० रुपयांवर पहिले सहाय्यक प्राध्यापक म्हणून नेमणूक होण्याचा मान त्यांना मिळाला. हा सन्मान मिळवणारे ते पहिले मराठी भारतीय होते. अध्यापनातील कौशल्यामुळे पुढे त्यांचा पगार इंग्रज प्राध्यापकांइतका करण्यात आला. १८४२ ते १८४४ या काळात ‘ॲक्टिंग प्रोफेसर’ म्हणून त्यांनी जितके विद्यार्थी घडवले तितके पूर्वी कधीही घडवले नव्हते, असा गौरव प्रोफेसर ऑर्लेबार यांनी केला होता. दादाभाई नौरोजी, शोराबजी शापूरजी यांच्यासारखे दिग्गज त्यांचे विद्यार्थी होते.

**शिक्षणप्रसारातील योगदान:** एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये कार्यरत असतानाच त्यांना दक्षिण कोकण व दक्षिण महाराष्ट्रातील सरकारी शाळांचे अधीक्षकपद देण्यात आले. नवीन शाळा सुरू करण्याचे नियम त्यांनी तयार केले आणि अनेक गावांत शाळांना मान्यता दिली. परदेशातील अध्यापक शिक्षण प्रणालीचा अभ्यास करून त्यांनी १८४५ मध्ये पहिली अध्यापक शाळा सुरू केली. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व सुसंस्कार रुजावेत यासाठी त्यांनी वसतिगृहही सुरू केले.

**‘दर्पण’ व ‘दिग्दर्शन’ :**

**समाजप्रबोधनाचे साधन :** ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू झालेले मुंबई दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र असल्याचे मराठी वृत्तपत्रसृष्टीतील इतिहासात नमूद प्रचलित पुराव्यांवरून मानले जाते. ‘स्वदेशी लोकांमध्ये परदेशातील विद्यांचा अभ्यास, देशाची समृद्धी व लोककल्याण’ हा त्यामागचा उद्देश होता. सुरुवातीला पाक्षिक असलेले दर्पण नंतर साप्ताहिक झाले. दिग्दर्शन या पहिल्या मराठी मासिकातून त्यांनी ज्ञान व माहितीप्रधान असे अभ्यासू लेखन केले.

**विज्ञान व सामाजिक सुधारणा:** दर्पणमधून त्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान, छापखाना, वाफेचे इंजिन, वैज्ञानिक शोधांची माहिती दिली. अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरांवर परखड टीका केली. सरकारच्या धोरणांतील त्रुटी दाखवून सुधारणा सुचवल्या. शेती, उद्योग, व्यापार, बँकिंग, स्त्री-पुरुष समानता, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण अशा विषयांवर त्यांनी निर्भीडपणे लेखन केले.

**मानसन्मान व संशोधन :** रॉयल जिऑग्राफिकल व रॉयल एशियाटिक सोसायटीशी संबंधित असलेले ते एकमेव भारतीय विद्वान होते. भारतीय शिलालेख व ताम्रपटांवरील त्यांचे अकरा शोध निबंध रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या पत्रिकेत प्रसिद्ध झाले. 1845 मध्ये त्यांनी ‘बॉम्बे नेटिव्ह लायब्ररी’ सुरू केली. तसेच त्यांनी ‘नेटिव्ह इम्प्रूमेंट सोसायटी’ या संस्थेचीही स्थापना केली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन १८४० मध्ये ‘जस्टिस ऑफ दि पीस’ या सन्माननीय पदावर त्यांची नियुक्ती झाली.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी अल्पायुष्यातही शिक्षण, पत्रकारिता व समाज प्रबोधन या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक पायाभरणीचे मोलाचे कार्य केले. त्यांच्या विचारांची धार आजही तितकीच तेजस्वी आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण करणे हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल..

**संदर्भ**

1) महाराष्ट्राचे शिल्पकार बाळशास्त्री जांभेकर – प्रा. डॉ शिवकुमार सोनाळकर
2) दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर कर्तृत्वाचा एक शोध – खंड 1 लेखन व संपादन – रविंद्र बेडकिहाळ
3) आचार्य बाळशास्त्री जांभेकर- व्ही. ए. पाटील

# किंगने वाढत्या संस्कारांची संगीत परंपरा नव्या रूपात साकारली

हा अल्बम भारताच्या समृद्ध संगीत ओळखीला अभिवादन करतानाच त्या ध्वनीला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न आहे

पुणे (दै. संध्या)



पॉप आयकॉन किंगने आपला आतापर्यंतचा सर्वात मोठा अल्बम राजा हिंदुस्तानी सादर केला आहे. आधुनिक पॉप शैलीतून भारताच्या समृद्ध संगीत परंपरेचा भव्य उत्सव या प्रकल्पात अनुभवायला मिळतो. या अल्बममध्ये किंगने सुरेल कथनशैली स्वीकारत भारतीय संगीत क्षेत्रातील प्रभावशाली आवाजांसोबत सहकार्य केले आहे श्रेया घोषाल, सुनिधी चौहान, शान, कुमार सानू आणि रेखा भारद्वाज. वॉर्नर म्युझिक इंडिया द्वारे प्रदर्शित हा अल्बम भारतीय संस्कृतीत या दिग्गजांनी निर्माण केलेल्या कालातीत जादूचा सन्मान करतो आणि त्या भावनात्मक ध्वनीविश्वाला नव्या पिढीसाठी पुन्हा साकारतो.

पहिली दोन सिंगल्स “कमाल है” आणि “जो इश्क हुआ” अल्बमच्या सुरेल दिशेला सुरुवातीपासूनच ठरवतात. “मजा प्यार करने में” हा रोमँटिक केंद्रबिंदू ठरतो, ज्यात किंग आणि कुमार सानू नॉस्टॅल्जिया आणि आधुनिक ताजेपणाचा सुंदर संगम घडवतात. या गाण्याच्या व्हिडिओमध्ये कुमार सानू किंगसोबत स्क्रीनवर दिसतात पिढ्यांना जोडणारा एक दुर्मिळ आणि पूर्णत्वाचा क्षण दिसून येतो.

यानंतर सुनिधी चौहान सोबत उत्साही, रेगे शैलीचा स्पर्श असलेला “ये दिल मुझको तू दे दे” येतो, तर “ये सफर” मध्ये शानसोबत मैत्री आणि सहप्रवासाचा उबदार सन्मान आहे. श्रेया घोषालसोबतचे “हाल ए दिल” अलौकिक शांतता निर्माण करते, तर रेखा भारद्वाज “वो पहला अक्षर” मध्ये काव्यात्म गूढता आणतात. शेवटचे सोलो गाणे “आहिस्ता आहिस्ता” भावपूर्ण गीतलेखन आणि उत्सवी संगीत निर्मितीसह आनंददायी शेवट घडवते.

या प्रकल्पाबद्दल बोलताना किंग म्हणतो: “राजा हिंदुस्तानी हा माझ्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संगीताचा सन्मान करत माझ्या शैलीला पुढे नेणारा प्रयत्न आहे. ज्यांच्या गाण्यांवर मी वाढलो त्या दिग्गजांसोबत काम करणे ही स्वतःमध्येच अविश्वसनीय गोष्ट आहे. त्यांच्या आवाजांनी मला सूर, भावना आणि कथनशैली समजायला शिकवले. आता त्यांच्यासोबत गाणे म्हणजे केवळ सहकार्य नाही; तो पूर्णत्वाचा क्षण आहे. हा अल्बम पारंपरिक आणि आधुनिक, नॉस्टॅल्जिया आणि वर्तमान पिढ्यांना जोडण्याबद्दल आहे . भारतीय पॉप संगीत परंपरेशी जोडलेले असूनही जागतिक, आधुनिक आणि निर्भय असू शकते, हे दाखवणे हा उद्देश आहे. माझ्यासाठी राजा हिंदुस्तानी हे कृतज्ञता आणि आत्मअभिव्यक्ती दोन्ही आहे.” या अल्बमच्या माध्यमातून किंग सुरेलता, भावविश्व आणि कथनशैलीकडे पुनरागमन करत काळाच्या दोन टोकांना जोडणारा संगीत प्रवास घडवतो. राजा हिंदुस्तानी आता सर्व प्रमुख स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.

## अक्षया नाईक ईनाची भूमिका साकारणार

मुंबई (दै. संध्या)



एण्ड टीव्ही आपली आगामी नवीन डिव्हाइन ड्रॅमेडी हे भगवान - कितना बदल गया इन्सान!बाबत उत्सुकता अधिक वाढवत आहे. या नवीन मालिकेमध्ये विनोद, भावना व आध्यात्मिकतेसह आधुनिक काळातील कौटुंबिक कथानकाचे सुरेख संयोजन आहे. प्रतिभावान कलाकारांमध्ये उत्साही ऊर्जा व मोहकतेची भर करणार आहेत अभिनेत्री अक्षया नाईक, ज्या मालिकेमध्ये महेश शर्माची (जयशंकर त्रिपाठी) धाकटी मुलगी ईनाची भूमिका साकारताना पाहायला मिळणार आहेत. जवळपास दोन वर्षांनंतर हिंदी टेलिव्हिजनवर पुनरागमन करत असलेल्या अक्षया या प्रोजेक्टला उत्साहवर्धक व खास मानतात. आपला आनंद व्यक्त करत ईनाची भूमिका साकारताना पाहायला मिळणाऱ्या अक्षया नाईक म्हणाल्या, मला या मालिकेचा भाग असण्याचा आनंद होत आहे. ही मालिका टेलिव्हिजनवर नेहमी दिसणाऱ्या मालिकांपेक्षा पूर्णत: वेगळे मनोरंजन देते. ही मालिका नेहमीच्या सासू-सूनेच्या कथानकाऐवजी हलक्या-फुलक्या स्वरूपात मनोरंजन देते, ज्यामध्ये मोहक प्रेमकथा आणि आनंददायी रोमांस-कॉमेडी वातावरण पाहायला मिळेल. मी अशी शैली यापूर्वी कधीच साकारलेली नाही.

# ‘ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र’ : भारतीय नौदलाचे जनक शिवछत्रपती

**छत्रपती शिवाजी महाराजांनी ‘ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र’ हे सूत्र ओळखून परकीय सत्तेला रोखण्यासाठी स्वदेशी आरमार, अभेद्य जलदुर्गांचे कवच उभारले. त्यांची हीच दूरदृष्टी आणि ‘आत्मनिर्भर’ विचारसरणी आजही भारताच्या सागरी सुरक्षेचा अभेद्य पाया आहे. छत्रपती शिवरायांच्या विषयावर थोडक्यात टाकलेला प्रकाश.**

डॉ. श्याम टरके, सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

(दै. संध्या)

सतराव्या शतकातील भारताची राजकीय स्थिती पाहिली, तर एका विचित्र विरोधाभासाचे दर्शन घडते. उत्तरेकडे मोगलांचे साम्राज्य शिखरावर होते. जमिनीवर त्यांची ताकद अफाट होती, पण समुद्राकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अत्यंत संकुचित होती. याउलट, भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर विशेषतः कोकणात परकीय सत्तांनी धुमाकूळ घातला होता. पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि जंजिऱ्याचे सिद्दी यांनी अरबी समुद्रावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. परिस्थिती इतकी बिकट होती की, खुद्द मोगल बादशहालाही मक्केला यात्रेसाठी जायचे असेल, तर पोर्तुगीजांकडून ‘काटाझ’ (Cartaz) नावाचा परवाना घ्यावा लागत असे. हा परवाना नसेल, तर जहाजे बुडवली जात किंवा जप्त केली जात. भारतीय व्यापाऱ्यांची अवस्था तर त्याहून दयनीय होती. परकीय सत्तांच्या या ‘सागरी दादागिरी’ला आणि त्यांच्या ‘ब्लू वॉटर पॉलिसी’ला (Blue Water Policy) सुरुंग लावण्याचे धाडस केवळ एकाच राजाने दाखवले, ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज!

महाराजांनी अगदी सुरुवातीलाच हे ओळखले होते, की परकीय सत्तांचे बळ त्यांच्या आरमारात आहे. त्यांना केवळ जमिनीवरील लढाईत हरवून चालणार नाही, तर समुद्रातच त्यांची नाकेबंदी करणे आवश्यक आहे. यातूनच ‘ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र’ (Jalmev Yasya, Balmev Tasya) हे सुप्रसिद्ध सूत्र जन्माला आले. हे केवळ एक वाक्य नव्हते, तर ती भारताच्या भावी सागरी सुरक्षेची आणि सार्वभौमत्वाची पहिली गर्जना होती.

सन १६५७ मध्ये कल्याण आणि भिवंडी ही शहरे स्वराज्यात आल्यानंतर महाराजांनी आरमार उभारणीला गती दिली. सुरुवातीला त्यांनी पोर्तुगीज तंत्रज्ञांची मदत घेतली खरी, पण परकीयांवर अवलंबून राहणे भविष्यात धोक्याचे ठरेल, हे त्यांनी तातडीने ओळखले. त्यांनी स्थानिक कारागिरांना जहाजबांधणीचे प्रशिक्षण दिले. युरोपीय जहाजे प्रामुख्याने ‘ओक’ (Oak) लाकडापासून बनली असत. महाराजांनी कोकणातील स्थानिक ‘सागवान’ लाकडाची निवड केली. सागवान हे लाकूड उष्णकटिबंधीय खाऱ्या पाण्यात ओकपेक्षा अधिक काळ टिकते आणि कुजत नाही, हे वैज्ञानिक सत्य महाराजांनी त्या काळात ओळखले होते. कल्याण, भिवंडी आणि पेण येथील गोदीमध्ये (Shipyards) रात्रंदिवस काम सुरू झाले आणि स्वराज्याची पहिली लढाऊ जहाजे समुद्रात उतरली.

मराठा आरमाराची रचना करताना महाराजांनी कोकणच्या भौगोलिक परिस्थितीचा खुबीने वापर केला. इंग्रज आणि पोर्तुगीजांची जहाजे आकाराने प्रचंड आणि खोल तळाची (Deep Draft) होती. ती खोल समुद्रात वेगाने धावू शकत, पण उथळ खाड्यांमध्ये किंवा खडकाळ किनाऱ्यावर ती निकामी ठरत. यालाच प्रतिशह देण्यासाठी महाराजांनी मुद्दाम ‘उथळ तळाची’ (Shallow Draft) आणि आकाराने मध्यम जहाजे तयार केली. यात गुराब, गलबत, पाल, मचवा, होडी आणि तरांडी यांचा समावेश होता.

रणनीती अगदी साधी पण प्रभावी होती. मराठा जहाजे शत्रूच्या मोठ्या जहाजांना उथळ पाण्यात किंवा अरुंद खाडीत खेचून आणत. तिथे शत्रूचे मोठे जहाज अडकले, की मराठ्यांच्या छोट्या वेगावान बोटी चहुबाजूने हल्ला चढवत. शत्रूच्या तोफांची दिशा फिरण्याआधीच मराठे जहाजावर चढून ‘हँड-टू-हँड’ लढाई करत. समुद्रातील या ‘गनिमी काव्या’मुळे बलाढ्य युरोपीय सत्तांना कोकणच्या किनाऱ्यावर कधीच पूर्ण ताबा मिळवता आला नाही.

शिवाजी महाराजांनी आरमाराला बळ देण्यासाठी सागरी किल्ल्यांची एक साखळीच निर्माण केली. हे किल्ले म्हणजे केवळ संरक्षणात्मक वास्तू नव्हत्या, तर ते आरमाराचे ‘लॉजिस्टिक हब’ आणि ‘वॉच टॉवर्स’ होते. सिंधुदुर्ग किल्ल्याचे उदाहरण घेतले, तर आजही थक्क व्हायला होते. हिरोजी इंदुलकरांनी या किल्ल्याचा पाया भरताना ५०० खंडी शिसे (Lead) वापरले, जेणेकरून लाटांच्या तडाख्यात पाया हलू नये.

विजयदुर्ग किल्ल्याची रचना तर आणखीनच कल्पक होती. तिथे समुद्राच्या पाण्याखाली एक संरक्षक भिंत बांधली होती, जी भरतीच्या वेळी दिसत नसे. शत्रूची जहाजे वेगाने किल्ल्याकडे येताना या भिंतीवर आदळून फुटत, पण मराठ्यांच्या उथळ बोटी त्यावरून सहज जात. खांदेरी, उंदेरी आणि कुलाबा यांसारख्या किल्ल्यांनी मुंबईच्या इंग्रजांवर वचपा ठेवला होता.

महाराजांचे आरमार केवळ संरक्षणात्मक नव्हते, तर ते आक्रमकही होते. १६६४ मध्ये ८५ जहाजांच्या ताफ्यासह त्यांनी कर्नाटकातील बसरूरवर (कुंदापूर) केलेला यशस्वी हल्ला, हे मराठा आरमाराच्या ‘शक्ती प्रक्षेपणाचे’ (Power Projection) उत्तम उदाहरण आहे. मायनाक भंडारी, लाय पाटील, दर्यासारंग आणि पुढे कान्होजी आंग्रे यांसारखे निष्ठावान आणि पराक्रमी नौदल प्रमुख या आरमारात घडले. स्थानिक कोळी आणि भंडारी समाजाला संघटित करून महाराजांनी खऱ्या अर्थाने एक ‘लोक-आरमार’ उभे केले. आजच्या भारताचे ‘महासागर’ (Mutual and Holistic Advancement for Security and Growth Across Regions) धोरण आणि ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनांची मुळे शिवरायांच्या विचारसरणीतच सापडतात. भारतीय नौदलाने आपल्या ध्वजावर शिवमुद्रेचा अष्टकोनी आकार स्वीकारून महाराजांच्या वारशाचा सन्मान केला आहे. भारताची पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका ‘आयएनएस विक्रांत’ ही शिवरायांच्या स्वदेशी जहाजबांधणीच्या स्वप्नाचे आधुनिक रूप आहे.



३५० वर्षांपूर्वी महाराजांनी दिलेला हा द्रष्टेपणा आजही तितकाच महत्त्वाचा आहे. भारताच्या सागरी सीमा सुरक्षित ठेवायच्या असतील, तर ‘ज्यापाशी आरमार, त्याचा समुद्र’ हे सूत्र विसरून चालणार नाही. म्हणूनच, छत्रपती शिवाजी महाराज ‘भारतीय नौदलाचे जनक’ आहेत. शिवजयंतीच्या निमित्ताने त्यांच्या या अफाट कार्य कर्तृत्वाला मानाचा मुजरा! ■

# ‘परिवर्तन २०२६’ सोहळ्यास उत्फुर्त प्रतिसाद

## १२०० हून अधिक उद्योजकांचा सहभाग

पुणे (दै. संध्या)

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल (BBNG) तर्फे आयोजित वार्षिक बिझनेस कॉन्क्लेव्ह ‘परिवर्तन २०२६’ हा नुकताच वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे दिमाखात पार पडला. देश-विदेशातील १२०० हून अधिक ब्राह्मण उद्योजकांनी या मेगा संमेलनात सहभाग नोंदवत नेटवर्किंग, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचा नवा विक्रम प्रस्थापित केला.

ब्राह्मण समाजातील उद्योजक, उद्योगपती व व्यावसायिकांना एकत्र आणून परस्पर सहकार्याची मजबूत साखळी निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. दोन दिवसीय कार्यक्रमात पॅनेल चर्चासत्रे, प्रेरणादायी व्याख्याने, फायरसाईड चॅट्स,





बी-टू-बी कॉन्क्लेव्ह, पॉवरपॉईंट सादरीकरणे व परस्परसंवादी सत्रांचा समावेश होता. ‘परिवर्तन’चे कॅप्टन श्री. नंदन गुमास्ते यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाला अखिल भारतीय संत समितीचे महासचिव परमपूज्य स्वामी जितेंद्रानंद सरस्वती, राज्यसभेच्या सदस्या डॉ. मेधा कुलकर्णी, कामत हॉटेल्स समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. विठ्ठल व्यंकटेश कामत, उद्योगपती श्री. प्रकाश भालेराव आणि श्री. उदय निरगुडकर यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते BBNG स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले तसेच प्रायोजकांचा सन्मान करण्यात आला.



सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे शिवजयंती निमित्त उत्सवाचे आयोजन बुधवार पेठेतील कै.श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरासमोरील जय गणेश प्रांगण येथे करण्यात आले होते. शिवजयंतीच्या निमित्ताने पारंपरिक वाद्यवादन झाले. तसेच शिवसाई प्रतिष्ठान ट्रस्ट निर्मिती गणेश लोणारे व सहकारी प्रस्तुत छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील मृत्युंजय हे धगधगते महानाट्य सादर करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### टीएसपीएल ग्रुपने गाजवली शिवजयंती

चाकण (दैनिक संध्या) : टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्स या ग्रुपच्या वतीने चाकण येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. टॅलेंटकॉर्पचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद व व्यवस्थापकीय संचालिका रुमा सैय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती निमित्त चाकण येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवरायांच्या शौर्य, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, न्यायप्रियता आणि उत्तम प्रशासनाच्या तत्त्वांचा डॉ. सैय्यद यांनी गौरव केला. राजांच्या पराक्रमाने आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्याने इतिहास घडला असून, आजही त्यांच्या विचारांमधून प्रेरणा मिळत असल्याचे सैय्यद यांनी यावेळी स्पष्ट केले. शिवाजी महाराजांचे धैर्य, रणनीती कौशल्य आणि प्रजाहितदक्ष शासन ही मूल्ये आजच्या कार्यसंस्कृतीतही तितकीच महत्त्वाची असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. सामर्थ्या बरोबरच जबाबदारीची जाणीव आणि प्रगती सोबत एकतेचा संदेश देणारे त्यांचे जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी रुमा सैय्यद यांनी सांगितले. याप्रसंगी प्रकाश राठोड, भारती तटके, पुनम खताळे, आशा गौतम, लोकेश परदेशी, पुरुषोत्तम गायकवाड, शिवाजी पाटील, महादेव माने, सुखदेव बोराडे, यश मतलाने, गौरी मानकर, वंदना वाढईकर, पूजा मोहिते, पूजा रसाळ आदी उपस्थित होते. पुनम खताळे यांनी स्वागत केले. भारती तटके यांनी प्रास्ताविक, तर आशा गौतम यांनी सूत्रसंचालन केले. यश मतलाने यांनी आभार मानले.




### चाकणला ज्ञानवर्धिनी विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

चाकण (दैनिक संध्या) : स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे येथील ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल आणि स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेजमध्ये विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई सुरेशभाऊ गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी अंधश्रद्धानिर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष मनोहरबापू शेवकरी, संस्थेचे अध्यक्ष विकासभाऊ गोरे, अंकुश बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक प्रेरणा काळे, विभाग प्रमुख दत्तात्रय लिंभोरे, सर्व विभाग शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, राज्यगीत व शिवाजी महाराज यांची आरती गाऊन झाली. विद्यार्थी यांनी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे, महाराणी सईबाई, मावळे यांच्या वेशभुषा केल्या होत्या. सांस्कृतीक कार्यक्रम पोवाडा, शिवाजी महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले. मनिषाताई गोरे यांनी सांगितले की, " आपल्या जीवनात छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा आत्मसात करून आपले ध्येय गाठता येईल. फक्त दाढी वाढवून, चंद्रकोर काढून महाराज आत्मसात होणार नाही. आपण व्यसन सोडले पाहिजे, महिलांना सन्मानाने वागणूक देणे, संरक्षण करणे, एकमेकांना समजून घेणे गरजेचे आहे." विकास गोरे यांनी स्वागत केले. दत्तात्रय लिंभोरे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

### वरोडीच्या उपसरपंचपदी संदेश वरे बिनविरोध



उत्रौली (दैनिक संध्या) : वरोडी खुर्द (ता. भोर) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संदेश नारायण वरे यांची शुक्रवारी (ता. २०) बिनविरोध निवड करण्यात आली. वरोडी खुर्दचे उपसरपंच रोहिदास वरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदाकरिता निवडणूक घेण्यात आली. सरपंच शीतल संदीप भिलारे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली. संदेश वरे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामसेवक शामबाला मुळे यांनी निवडणूक सहायक अधिकारी म्हणून काम पाहिले. सरपंच शीतल भिलारे यांच्या हस्ते उपसरपंच संदेश वरे यांचा सत्कार करण्यात आला. सरपंच शीतल भिलारे, संदेश वरे, रोहिदास वरे, सागर वरे, सुरेखा वरे, मेघा वरे आदी सदस्य उपस्थित होते. सर्वांना विचारात घेऊन गावची विकास कामे करणार असल्याचे नूतन उपसरपंच संदेश वरे यांनी सांगितले. या प्रसंगी भगवान वरे, माजी संरपंच एकनाथ वरे, माजी सरपंच आनंदा वरे, सर्जेराव वरे, धर्मु वरे, कृष्णा वरे, शिवाजी वरे, काळूराम वरे, श्यामराव वरे, संदीप भिलारे उपस्थित होते.

## श्री शिवाजी मराठा सोसायटीच्यावतीने भव्य शिवजयंती मिरवणूक

पुणे (दै. संध्या)

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सव व मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार पेठेतील सोसायटीच्या प्रांगणातून मिरवणुकीला प्रारंभ झाला. यावेळी तब्बल १००० पेक्षा अधिक विद्यार्थी पारंपरिक वेशात रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी इतिहास तज्ञ डॉ.प्रमोद बोऱ्हाडे, मानद सचिव अण्णा थोरात, सहसचिव विकास गोगावले, खजिनदार जगदीश जेधे, कारभारी मंडळ अध्यक्ष- कमल व्यवहारे व नियामक मंडळाचे सदस्य रघुनंदन जाधव, सचिन शिंदे, प्रदीप उरसळ, अमर शिंदे, तसेच तानाजी घारे, पद्माकर पवार आदी उपस्थित होते. डॉ. तुळशीराम हरि दाते, ज्ञानराज रामचंद्र



व्यवहारे, संभाजी रामचंद्र भोसले, दत्तात्रय मारुती मुळे, दत्तात्रय काशिनाथ कोलते, विजयकुमार शांतिनाथ बोर्डे, ॲड. मोहनराव बाबुराव देशमुख, संभाजी कोंडीबा कापसे, दत्तात्रय मारुतीराव मुळे, श्रीकृष्णाजी विष्णूजी संकपाळ, हरिश्चंद्र कृष्णाजी शेंडकर, नामदेव कृष्णाजी शिळमकर, वसंत रघुनाथराव शिंदे, कृष्णराव तात्याबा सोनवणे, गंगाधर घारे, वासंती बोर्डे, या सर्व संस्थेच्या ज्येष्ठ सभासदांचा सन्मान करण्यात आला. सोसायटीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मिरवणूक सुरू झाली.

## शिरदाळे येथे शाळकरी मुलांकडून शिवजयंती उत्साहात साजरी

मंचर (दै. संध्या)

संपूर्ण देशभरात शिवजयंती उत्साहात संपन्न झाली.ग्रामीण भागात देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली.शिरदाळे ता.आंबेगाव येथे लहान मुलांनी एकत्र येत शिवजयंती साजरी केली. त्यांचे यंदाचे हे दुसरे वर्ष होते. सकाळी सर्व लहान मुलांनी एकत्र येत छोटा मंडप तयार केला.त्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली.सकाळी सामुहिक आरती घेण्यात आली. त्यांनतर सर्वांनी गावातून वर्गणी जमा केली.ग्रामस्थांनी देखील त्यांना चांगला प्रतिसाद दिला. दिवसभर मुलांची लगबग सुरूच होती.सायंकाळी श्री.बाळासाहेब रणपिसे यांनी आपल्या ट्रॅक्टर मिरवणुकीसाठी उपलब्ध करून दिला.सायंकाळी सात वाजता



गावातून मिरवणूक काढण्यात आली.यावेळी मुलांनी वेगवेगळी वेशभूषा करून मिरवणुकीत रंगत आणली होती.गावच्या मुख्य चौकात हनुमान मंदिर पटांगणात मिरवणुकीची सांगता करण्यात आली.त्यानंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

गावातील लहान मुलांनी एकत्र येत साजरी केलेली शिवजयंती त्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद यामुळे सायंकाळी गावतले वातावरण शिवमय झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओम रणपिसे,ऋत्विक सरडे,वरद तांबे,शिवम रणपिसे,ऋषभ सरडे,तेजस मिंडे,नचिकेत तांबे,तनिष्का रणपिसे,तनुजा मिंडे,केतकी तांबे,रिद्धी तांबे,कणीक्षा तांबे यांचा सहभाग होता.

छत्रपतींबद्दल असलेल्या आदराचे आणि अभिमानाचे प्रतीक या बालाचमूनच्या या कार्यातून अधिक गडद झाले तर महाराजांची प्रत्येक गोष्ट येणाऱ्या पिढीला अधिक चालना देणारी आहे हे यातून स्पष्ट झाले.

तर मा.उपसरपंच मयुर सरडे यांनी ग्रामस्थांना या कार्यक्रमासाठी देणगी देण्याचे आवाहन केले होते त्याला ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद देत देणगी जमा केली तर अनिकेत चौधरी,संकेत तांबे,कल्पेश सरडे,भुपेंद्र तांबे,कुणाल तांबे,सोमनाथ तांब,श्रीनाथ तांबे,शुभम तांबे यांनी या लहान मुलांना शुभेच्छा दिल्या.

## मोठा कंटेनर घुंडरे आळीतील धर्मशाळेत घुसला; जीवितहानी टळली

### हायट बॅरिगेट्स बसविण्याची नागरिकांची ठाम मागणी

आळंदी (दै. संध्या)

आळंदी येथील घुंडरे आळी परिसरात दि.19 फेब्रुवारीला एक मोठा कंटेनर थेट धर्मशाळेच्या आवारात घुसल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र धर्मशाळेच्या भिंतीचे व परिसरातील मालमत्तेचे नुकसान झाले आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घुंडरे आळी हा अरुंद आणि वर्दळीचा मार्ग आहे. तरीही अवजड वाहने या मार्गाने जात असल्याने नागरिकांकडून वारंवार आक्षेप




नोंदवले जात होते. आजच्या घटनेने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाचे नियंत्रण सुटल्याने कंटेनर सरळ धर्मशाळेकडे वळला आणि भिंत तोडत आत शिरला. सुदैवाने त्या वेळी परिसरात गर्दी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनीही तत्काळ पंचनामा करून पुढील कारवाई सुरू केली आहे. मात्र, या अपघाताने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला आहे. परिसरातील रहिवाशांनी ‘मोठी अवजड वाहने जाऊ नयेत’ यासाठी तातडीने उंची मर्यादा दर्शविणारे हायट बॅरिगेट्स बसवावेत, अशी ठाम मागणी केली आहे. वारंवार होणाऱ्या अशा घटनांकडे प्रशासनाने दुर्लक्ष करू नये, अन्यथा पुढील वेळी मोठी जीवितहानी होऊ शकते, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक रहीवाशी प्रा.श्रीधर घुंडरे यांनी व्यक्त केली.

दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस पावले उचलली गेली तरच अशा अपघातांना आळा बसू शकतो, हेच या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

## घोडेगाव आश्रमशाळेत १ मार्चपासून नवीन प्रवेशासाठीची नावनोंदणी

घोडेगाव (दै. संध्या)

घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेत १ मार्च २०२६ पासून नवीन प्रवेशासाठीची नावनोंदणी सुरू होणार आहे. इयत्ता पहिलीच्या वर्गात नवीन प्रवेश घेण्यासाठीची ही प्रक्रिया १५ एप्रिलपर्यंत सुरू असेल, अशी माहिती प्राचार्य चंद्रकांत नाईकडे यांनी दिली.

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या चार जिल्ह्यांसाठी आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजासाठी चालविण्यात येत असलेली ही एकमेव इंग्रजी माध्यम आश्रमशाळा आहे. इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी ४५ विद्यार्थी संख्या मंजूर असल्याने पालक आपल्या पाल्याची येथे मोठ्या प्रमाणात नावनोंदणी करतात. घटस्फोटीत महिला, विधवा महिला, दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यांच्या पाल्यांना प्रवेश प्रक्रियेत प्राधान्य दिले जाते. नवीन प्रवेशासाठी पाल्याचा किंवा पालकांचा जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, वय ६ वर्षे पूर्ण असल्याचा पुरावा-जन्मदाखला, आधार कार्डाची छायांकित प्रत, विधवा महिलांच्या पतीचा मृत्यू दाखला, घटस्फोटीत महिलांचा आवश्यक पुरावा ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

## कथाकथनाची परंपरा पुन्हा जिवंत करणे गरजेचे : डॉ. दिलीप गरु

पुणे (दै. संध्या)

पूर्वी आपल्या समाजात कथा-कथनाची समृद्ध परंपरा होती. लहानपणी छत्रपती शिवाजी महाराज यांनाही रामायण, महाभारत यांसारख्या प्रेरणादायी कथा ऐकवण्यात आल्या. त्या कथांनीच त्यांच्यातील संस्कार आणि नेतृत्व घडवले. पण आता मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात ही परंपरा कमी होत चालली आहे. पालक व्यस्त आहेत. आजी-आजोबा मुलांना झोपताना गोष्टी सांगत असत. शिक्षकही शिकवताना गोष्टींचा आधार घेत. त्यामुळे मुलांमध्ये संस्कार, मूल्ये आणि संवेदनशीलता विकसित होत असे. कथा-कथन ही केवळ गोष्ट सांगण्याची कला नसून, संस्कार घडवण्याचा प्रभावी मार्ग आहे. त्यामुळे कथाकथनाची परंपरा पुन्हा जिवंत करणे खूप गरजेचे आहे, असे मत बालसाहित्यिक दिलीप गरुड यांनी व्यक्त केले. आदिश जैन फाउंडेशनच्या वतीने सदाशिव पेठेतील अक्षरवेल सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात डॉ. दिलीप गरुड कथाकथन या विषयावर बोलत होते. यावेळी श्रीपाल ललवाणी, ज्येष्ठ कवी म. भा. चव्हाण, भारत विठ्ठलदास, पुणे विद्यार्थी गृहाचे पुष्कर आबनावे, फाउंडेशनच्या अध्यक्ष मृणाल जैन उपस्थित होते. दिलीप गरुड म्हणाले, मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात



मुलांना गोष्ट सांगण्याची परंपरा कमी होत चालली आहे. पालक व्यस्त आहेत, शिक्षकांनाही वेळ कमी मिळतो. हसत-खेळत शिकवण्याचा कथाकथन हा सुंदर मार्ग आहे. कार्यक्रमात भारत विठ्ठलदास यांची चमत्कार प्रात्यक्षिके झाली. यावेळी त्यांनी पैशाचा पाऊस पाडणे, हवेतून सोन्याची चेन काढणे, पाण्यावर आग पेटवणे अशी प्रात्यक्षिके मुलांना करून दाखवली. कार्यक्रमात वंचित विशेष मुलांनी देखील सहभाग घेतला होता. भारत विठ्ठलदास म्हणाले, काही भोंदू लोक देवाचे नाव घेऊन फसवतात. ते पैशांचा पाऊस पाडल्याचे, पाणी पेटल्याचे दाखवतात किंवा चमत्कार केल्याचा आभास निर्माण करतात. प्रत्यक्षात या सर्व गोष्टींमागे विज्ञान असते. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्राच्या काही प्रयोगांमुळे असे प्रकार सहज करता येतात. मुलांनी त्यांची हातचलाखी समजून घ्यावी कारण मुले हेच देशाचे भविष्य आहे आणि त्यांनी भोंदू लोकांच्या जाळ्यात अडकू नये.



## आडाचीवाडी गावाला काटेवाडीकरांची भेट

वाल्हे (दै. संध्या)

ग्रामपंचायतीने राबविलेल्या ग्रामविकासाच्या विविध सोयी-सुविधा नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विकासकामे पाहण्यासाठी काटेवाडी (ता. बारामती) येथील ग्रामस्थांनी आडाचीवाडी (ता. पुरंदर) गावाला नुकतीच भेट दिली.या भेटीदरम्यान आडाचीवाडी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबविलेल्या विविध सोयी-सुविधा पाहून काटेवाडीकर अक्षरशः थक्क झाले. आडाचीवाडी येथे गावातील अंतर्गत व पाणंद रस्त्यांना थोर महापुरुषांची नावे देत शेवटच्या टोकापर्यंत प्रशस्त सिमेंट काँक्रीट रस्ते उभारण्यात आले आहेत. रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात जांभूळ,नारळाची लागवड करून उत्पन्नाचा एक शाश्वत स्रोत निर्माण करण्यात आला आहे. ग्रामपंचायत कार्यालय, महिला बचतगट भवन, सुमारे ३०० वर्षांपासून अस्तित्वात असलेला खोल आड आणि त्याच्या माध्यमातून राबविण्यात आलेली पिण्याच्या पाण्याची योजना ही विकासाची ठळक उदाहरणे ठरलीआहेत. गावातील अद्यावत वातानुकूलित व्यायामशाळा (जिम) पाहून काटेवाडी ग्रामस्थ अचंबित झाले.यावेळी उपस्थित काही युवक व महिलांनी प्रत्यक्ष व्यायाम करू पाहण्याचा मोह देखील आवरला नाही. रम्य, शांत आणि प्रशस्त नाना-नानी पार्क पाहून ज्येष्ठ नागरिक विशेष सुखावले.

स्मशानभूमीच्या सभोवतालच्या परिसरात एखाद्या वास्तूपेक्षाही अधिक सुंदर अशी बैठक व्यवस्था उभारण्यात आली असून येथे उच्च प्रतीच्या संगमरवरी ग्रे नाईट मार्बल फरशीचा वापर करण्यात आला आहे. याच ठिकाणी गावातील निवृत्त शिक्षिकांच्या पुढाकारातून अभ्यासिका उपक्रम राबविण्यात येत आहे.यासाठी दररोज सायंकाळी सात वाजता भोंगा दिला जातो. त्यानंतर गावातील पहिलीपासून पुढील इयत्तेतील विद्यार्थी एकत्र येऊन एक तासाहून अधिक वेळ नियमित अभ्यास करतात. हा नाविन्यपूर्ण उपक्रम पाहून काटेवाडी ग्रामस्थ विशेष भारावून गेले. या अभ्यास दौऱ्यात छत्रपती साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष प्रशांत काटे, संचालक अनिल काटे, उद्योजक विद्याधर काटे, संजय काटे, सरपंच मंदाकिनी भिसे, उपसरपंच मिलिंद काटे, अजित काटे, श्रीधर घुले, दूध संघाचे संचालक संजय शेळके, सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब वायसे,रणजीत गायकवाड, भारत जाधव,बाळासाहेब शिंदे,शितल काटे, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब भोईटे, पत्रकार गजानन हगवणे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत प्रशासन, महिला पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, आडाचीवाडीचे रहिवाशी व रायगड चे उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी गावात राबविण्यात आलेल्या विविध विकास योजनांची सविस्तर माहिती दिली.

दिवंगत उपमुख्यमंत्री पवार यांनी आडाचीवाडी गावासाठी केलेल्या मोठ्या प्रमाणावरील मदतीची आठवण सांगताना शिर्के काही क्षण निःशब्द झाले, ज्यामुळे उपस्थित वातावरण भावनिक झाले. यावेळी,माजी जिल्हा परिषद सदस्या शालिनी पवार, सरपंच सुवर्णा पवार, उपसरपंच मोहन पवार, सुर्यकांत पवार दत्तात्रेय पवार आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.